| लातूर | वर्ष ३५ वे | अंक ८९ वा | सोमवार, दिनांक २२ जून २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

## धाराशिव-लातूर-बीड विधानपरिषद निकाल २०२६:

# भाजपचे बसवराज पाटील रेकॉर्ड ब्रेक ८४४ मतांसह विजयी; काँग्रेसची मते फुटल्याचे उघड

### बसवराज पाटलांना ८४४ मते तर देशमुखांना अवधी १२५; काँग्रेसची मते फुटल्याने खळबळ

सोमवार, २२ जून २०२६ रोजी पार पडलेल्या अधिकृत मतमोजणीच्या अंती समोर आलेली आकडेवारी महाविकास आघाडीला मोठा धक्का देणारी ठरली. या मतदारसंघातील एकूण ९८८ पात्र मतदारांपैकी ९८३ लोकप्रतिनिधींनी आपल्या मतदानाचा हक्क बजावला होता. मतमोजणी पूर्ण झाली तेव्हा भाजपचे बसवराज पाटील यांना तब्बल ८४४ मते पडल्याचे समोर आले. त्या तुलनेत काँग्रेसचे महेश देशमुख यांना केवळ १२५ मते मिळवता आली, तर मतदारांची एकूण १४ मते बाद (अवैध) ठरली आहेत. या निवडणुकीत महायुतीकडे स्वतःचे अधिकृत संख्याबळ ६२४ मतदारांचे होते. मात्र, बसवराज पाटील यांना ८४४ मते मिळाल्याने अपक्ष मतदारांसह महाविकास आघाडीची अनेक मते फुटल्याचे (Cross Voting) आता अधिकृतपणे स्पष्ट झाले आहे.

### आ. अमित देशमुख यांनी महेश देशमुख यांच्या विजयाचा व्यक्त केला होता विश्वास, मात्र महेश देशमुख यांचा दारुण पराभव.

**धाराशिव/प्रतिनिधी**: मराठवाड्याच्या राजकीय पटलावर अत्यंत प्रतिष्ठेच्या ठरलेल्या उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ विधानपरिषद निवडणूक २०२६ चा अंतिम निकाल सोमवारी अपेक्षेनुरूप महायुतीच्या बाजूने लागला आहे.

या अत्यंत चुरशीच्या आणि ऐतिहासिक ठरलेल्या लढतीत भाजपचे दिग्गज नेते आणि अधिकृत उमेदवार बसवराज पाटील मुरूमकरा यांनी विरोधकांना चारीमुंड्या चित करत तब्बल ७१९ मतांचे विक्रमी मताधिक्य मिळवून दणदणीत विजय साकारला आहे. त्यांनी काँग्रेसचे अधिकृत उमेदवार महेश देशमुख यांचा अत्यंत दारुण पराभव केला असून, निकाल जाहीर होताच धाराशिव शहरातून भाजप आणि महायुतीच्या कार्यकर्त्यांनी विजयी उमेदवाराची ढोल-ताशांच्या गजरात भव्य विजयी मिरवणूक काढली आहे.

**संख्याबळाची योग्य मोट आणि चोख रणनीती;**

धाराशिव शहरात गुलालाची उधळण निवडणुकीची घोषणा झाल्यापासूनच या मतदारसंघात भाजपकडे स्पष्ट बहुमत होते. मात्र, लातूर, बीड आणि धाराशिव या तिन्ही जिल्ह्यांतील अपक्ष आणि आघाडीतील नाराज लोकप्रतिनिधींची यशस्वी मोट बांधण्यात बसवराज पाटील आणि महायुतीच्या चाणक्यांना मोठे यश आले. य ा ऐतिहासिक विजयानंतर धाराशिव जिल्हा भाजप आणि महायुतीच्या गोटात अभूतपूर्व उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे. विजय घोषित होताच शेकडो कार्यकर्त्यांनी छत्रपती शिवाजी




महाराज चौक आणि मुख्य बाजारपेठेत फटाक्यांची जोरदार आतषबाजी केली, एकमेकांना पेढे भरवले आणि 'गुलाल' उधळून संपूर्ण शहर भगवेमय करून सोडले. या निकालामुळे मराठवाड्याच्या स्थानिक स्वराज्य संस्थांवरील महायुतीची पकड अधिक मजबूत झाली आहे.

### विधान परिषदेच्या १७ पैकी १७ जागांचा निकाल

- ठाणे - रवींद्र फाटक - शिवसेना, (बिनविरोध)
- यवतमाळ - दुष्यंत चतुर्वेदी - शिवसेना, (बिनविरोध)
- रायगड - रत्नागिरी - सिंधुदुर्ग - अनिकेत तटकरे - राष्ट्रवादी काँग्रेस, (बिनविरोध)
- पुणे - विक्रम काकडे - राष्ट्रवादी काँग्रेस, (बिनविरोध)
- वर्धा - गडचिरोली - चंद्रपूर - अरुण लखाणी - भाजपं, (बिनविरोध)
- अहिल्यानगर - प्राजक्त तनपुरे - भाजप, (बिनविरोध)
- छत्रपती संभाजीनगर-जालना- सुहास शिरसाट- भाजप
- नाशिक- गोकुळ गिते, (अपक्ष)
- भंडारा- गोंदिया- अविनाश ब्राह्मणकर, भाजप
- सांगली- सातारा- धैर्यशील कदम, भाजप
- परभणी- हिंगोली- सईद खान, शिवसेना
- सोलापूर- राजेंद्र राऊत, भाजप
- धाराशिव-लातूर- बीड- बसवराज पाटील, भाजप
- नागपूर- राजीव पोतदार, भाजप
- जळगाव- नंदकिशोर महाजन, भाजप
- अमरावती- प्रवीण पोटे, भाजप
- नांदेड- अमर राजूरकर, भाजप

www. latursamachar. com वर रोज वाचा ऑनलाईन....

# मुंबई -लातूर-बिदर एक्सप्रेसला ३ अतिरिक्त डबे मंजूर: खा.डॉ. काळगे

**लातूर/प्रतिनिधी:** लातूर - मुंबई - बिदर एक्सप्रेस रेल्वेला अतिरिक्त तीन डबे मंजूर करण्याच्या मागणीला यश आल्याची माहिती लातूरचे खासदार डॉ. शिवाजीराव काळगे यांनी दिली. रेल्वे प्रशासनाकडे सातत्याने लावून धरलेल्या मागणीची पूर्तता झाल्याने काही प्रमाणात प्रवाशांना दिलासा मिळणार असल्याचेही खा. डॉ. काळगे यांनी सांगितले.

यासंदर्भात बोलताना खा. डॉ. शिवाजीराव काळगे म्हणाले की, मुंबई -लातूर - बिदर या गाडीला अतिरिक्त डबे मिळावेत, ही मागणी मी माझ्या राजकीय कारकिर्दीच्या सुरुवातीपासून सातत्याने मांडत आलो आहे. खासदार म्हणून निवडून आल्यापासून केंद्रीय रेल्वे प्रशासनाकडे या विषयाचा सातत्याने पाठपुरावा केला.

बिदर स्थानकावरील प्लॅटफॉर्मची लांबी अपुरी असल्यामुळे दक्षिण मध्य रेल्वेकडून हा विषय काही काळ प्रलंबित होता. नुकत्याच सिकंदराबाद विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक यांच्या दौऱ्यादरम्यान या विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्याचा सकारात्मक परिणाम म्हणून आता गाडीच्या रचनेत वाढ झाली आहे.

त्यानुसार, गाडी क्रमांक २२१०७ / २२१०८ व २२१४३ / २२१४४ मुंबई-लातूर - बिदर सुपरफास्ट एक्सप्रेसमध्ये दि. २५ जून २०२६ पासून ३ अतिरिक्त डबे जोडण्यात येणार आहेत. यामध्ये एक वातानुकुलित द्वितीयश्रेणी (AC 2 Tier) प्रवासी क्षमता ४६ असेल, एक वातानुकुलित तृतीय श्रेणी



(AC 3 Tier) ज्याची प्रवासी क्षमता ६४ असेल व एक शयनयान श्रेणी (Sleeper Class) ज्याची प्रवासी क्षमता ७२ असेल. यामुळे या गाडीची रचना २१ डब्यांवरून २४ डब्यांची होणार असून अधिक प्रवाशांना आरक्षणाची सुविधा उपलब्ध होणार आहे.

या निर्णयाबद्दल आपण केंद्रीय रेल्वे प्रशासन, विशेषतः मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक तसेच दक्षिण मध्य रेल्वे प्रशासनाचे मनःपूर्वक आभार व्यक्त करतो, असे खा. डॉ. काळगे यांनी बोलून दाखविले. मात्र, हा पाठपुराव्याचा पहिला टप्पा आहे. लातूर- बिदर मार्गावरील प्रवाशांना अधिक सुरक्षित, अधिक आरामदायी आणि आधुनिक प्रवासाची सुविधा मिळावी, यासाठी या गाडीला जुन्या आयसीएफ डब्यांऐवजी अत्याधुनिक व अधिक सुरक्षित एलएचबी डबे उपलब्ध व्हावेत, ही आपली प्रमुख मागणी असून त्यासाठीचा पाठपुरावा यापुढेही पूर्वीप्रमाणेच सातत्याने सुरू राहणार आहे. जनतेच्या हितासाठी आणि लातूर लोकसभा मतदारसंघातील रेल्वे सुविधांच्या विकासासाठी माझे प्रयत्न अविरत सुरूच राहतील, अशी ग्वाहीही खा. डॉ. काळगे यांनी दिली आहे.



लातूर समाचार
LATUR SAMACHAR

**लातूर - मुंबई एक्सप्रेस मध्ये जनरल डबे अपुरे; प्रवाशांना जीव मुठीत धरून करावा लागतोय प्रवास**



**लातूर/मोईज सितारी**: लातूर, बीड, धाराशिव आणि परिसरातील हजारो प्रवाशांसाठी मुंबईकडे जाणाऱ्या रेल्वे प्रवासाचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. विशेषतः जनरल डब्यांमध्ये होणारी प्रचंड गर्दी पाहता प्रवाशांना अक्षरशः जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. सध्या उपलब्ध असलेले जनरल डबे अपुरे पडत असल्याने अतिरिक्त जनरल डबे वाढवावेत, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे

सुट्टीचे दिवस, सण-उत्सव, भरती प्रक्रिया, शिक्षण आणि रोजगारासाठी मुंबईकडे जाणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढते. मात्र रेल्वेत जनरल डब्यांची संख्या मर्यादित असल्याने अनेकांना उभ्याने किंवा दरवाज्यात लटकून प्रवास करावा लागत आहे. महिलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनाच या समस्येचा सामना करावा लागत असल्याचे चित्र आहे.

प्रवाशांच्या म्हणण्यानुसार, अनेक वेळा रेल्वे स्थानकावर तासनतास प्रतीक्षा करूनही डब्यात प्रवेश मिळत नाही. गर्दीमुळे भांडणे, ढकलाढकली आणि गैरसोयीच्या घटना वाढत आहेत. त्यामुळे प्रवाशांनी रेल्वे प्रशासनाकडे अतिरिक्त जनरल डबे जोडण्याची मागणी केली आहे.

विशेषतः लातूर-मुंबई मार्गावर नियमित धावणाऱ्या गाड्यांमध्ये जनरल डब्यांची संख्या वाढवून सामान्य प्रवाशांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. विद्यार्थी, कामगार, शेतकरी आणि व्यापारी वर्गाकडूनही ही मागणी सातत्याने होत असून रेल्वे प्रशासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी प्रवासी संघटनांनी केली आहे.

LATUR EDITION
04 Jun 2026 - Page 6

४ जून रोजी लातूर समाचार मध्ये लातूर मुंबई एक्सप्रेस मध्ये जनरल डब्बे अपुरे या शीर्षकाची बातमी प्रकाशित केली होती त्या अनुषंगाने. लातूर-मुंबई-बिदर एक्स्प्रेसमध्ये जनरल डब्यांतील प्रचंड गर्दीमुळे प्रवाशांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. खासदार डॉ. शिवाजी काळगे यांच्या पाठपुराव्याने गाडीस तीन अतिरिक्त डबे मंजूर झाले असले तरी त्यामध्ये जनरल डब्यांचा समावेश नाही. त्यामुळे सर्वसामान्य व मध्यमवर्गीय प्रवाशांना अपेक्षित दिलासा मिळालेला नाही. वाढत्या गर्दीचा विचार करून अतिरिक्त जनरल डबे जोडावेत, अशी मागणी प्रवासी वर्गातून होत असताना. फक्त एसी आणि स्लीपर कोच चे डब्बे वाढवले असल्याने प्रवाशांमध्ये नाराजीचा सूर दिसत आहे.

### प्रभात किरणे

खाली पंचपकवांने, तनी भरजरी कपडे
उपाशी अर्धपोटी कष्टकरी, तनअर्धे उघडे
दोघांची ही अंत्यसंस्कार एकाच ठिकाणी
दोघांची राख सारखी, ना ओळखी

-इंजि. नागनाथ कलवले
लातूर ९७६४७ ८८२८८

### कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



राज्यात मान्सूनची दमदार एन्ट्री..
मात्र लातूरात नाही....



### चिमटा

दयाचा पातळ प्लास्टीकच्या पिशव्या व गुटखा निर्माण करणाऱ्यास मोठी शिक्षा होणे अपेक्षित आहे! त्यामुळे ही समस्या कायम सुटणार आहे!!

# लातूरमध्ये जागतिक योग दिन उत्साहात साजरा

## निरोगी राहण्यासाठी प्रत्येकाने योगाचा अंगीकार करावा-जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड

**लातूर/प्रतिनिधी:** भारतीय संस्कृतीचा अमूल्य ठेवा असलेला योग आज जागतिक पातळीवर स्वीकारला गेला असून, निरोगी आरोग्यासाठी प्रत्येकाने दैनंदिन जीवनात योगाचा अंगीकार करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी आज येथे केले.

जागतिक योग दिनानिमित्त लातूर येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे विशेष योगाभ्यास कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला लातूरकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. जिल्हा प्रशासन, लातूर शहर महानगरपालिका, पतंजली योग समिती आणि प्रजापिता ब्रह्मकुमारी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी लातूर शहर महानगरपालिकेच्या महापौर जयश्री सोनकांबळे, जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल






तांबे यांची प्रमुख उपस्थिती होती.

जगातील सुमारे १७० देशांनी योगाचे महत्त्व ओळखून त्याचा स्वीकार केला आहे. त्यामुळेच २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय स्तरावर साजरा केला जातो. शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी प्रत्येकाने दररोज किमान एक तास योगाभ्यास केला पाहिजे. तसेच, आरोग्यासोबतच पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येक नागरिकाने किमान एक झाड लावून त्याचे संवर्धन करावे, असे आवाहनही जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड यांनी यावेळी केले.

या प्रसंगी योग शिक्षक विष्णू भुतडा यांच्या मार्गदर्शनाखाली उपस्थितांनी विविध योगासने आणि प्राणायाम केला. केंद्र सरकारच्या आयुष मंत्रालयाने निश्चित केलेल्या योग शिष्टाचारानुसार प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. या कार्यक्रमास जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे, जिल्हा आयुष अधिकारी डॉ. सुधीर बनशेळकीकर, श्रुष्टी जगताप तसेच पतंजली योग समिती आणि प्रजापिता ब्रह्मकुमारी संस्थेचे पदाधिकारी, शासकीय अधिकारी, कर्मचारी, मारवाडी राजस्थान माध्यमिक विद्यालय, बंकटलाल लाहोटी इंग्लिश स्कूल, राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूल, देशिकेंद्र माध्यमिक विद्यालय आणि राजमाता जिजामाता माध्यमिक विद्यालयाचे विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला जिल्हा आयुष अधिकारी डॉ. सुधीर बनशेळकीकर यांनी प्रास्ताविक केले. जागतिक योग दिनाचे औचित्य साधून जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालये, शाळा आणि महाविद्यालयांमध्येही विविध विशेष कार्यक्रमांचे व योगाभ्यास सत्रांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती त्यांनी प्रास्ताविकात दिली.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## वाद व संघर्ष दोन पक्षात काळजी मात्र सर्वांना

राज्यात दोन शिवसेना झाल्या, दोन राष्ट्रवादी पक्ष झाले. त्यांच्यातील अंतर्गत प्रश्न असताना जनता मात्र तणावात दिसत आहे. वास्तविक कोण कोणत्या पक्षात जावे किंवा नाही हा त्यांचा अंतर्गत बाब आहे. जनता दर पाच वर्षांनी निवडूण देते, पुन्हा दुसऱ्या टर्मला मतदार मतदानास हजर राहातो. पाच वर्षात आमच्यासाठी काय केले हे विचारले जात नाही. तशी काही मतदारात हिंमत नाही हे उघड आहे. लोकप्रतिनिधी शब्दात अर्थ सामावला आहे. लोकप्रतिनिधी हा जनतेनी निवडलेला प्रतिनिधित्व करणारा व्यक्ती. सरकारमध्ये जनतेचे प्रश्न मांडणारा, जनतेचा प्रतिनिधी असाच होतो. तरी पाच वर्ष काय केले किंवा केले नाही तरी जनता पुन्हा त्यांच्या व्यक्तीला निवडूण देते ही आपल्या देशात वस्तूस्थिती आहे. सध्याला एका शिवसेनेतून दुसऱ्या शिवसेनेत जाणारे किंवा गेलेले लोकप्रतिनिधी! दोन्ही कडील तेच शिवसैनिक आहे. ठाकरे नको तर शिंदे गटात गेलेत, वास्तविक शिवसैनिकात कट्टरता असते, बेगडी हिंदुत्व नसते. ते कशालाही घाबरत नाहीत. वास्तविक एका सेनेत दम कोंदला जात असेल तर दुसऱ्या सेनेत गेल्यास बिघडणार कोठे? या बाबीचा विचार केला पाहिजे. देशात काय राज्यात विनाकारण चर्चा केली जाते. ह्या पक्षातून त्या पक्षात गेला. जर एखाद्याला बाब आवडली नाही तर दुसऱ्यावेळी निवडूण देवू नका. सध्याला चर्चा करून वायफळ प्रयत्न करता कशाला हेच कळून येत नाही. राज्यात अनेक प्रश्न आहेत. सध्याला पावुस नाही. राज्यात एक टक्का पेरण्या झाल्या आहेत. पावसाला पंधरा दिवस झाले अजून पेरणीचा पत्ता नाही. लबाड अनुमान सांगणारे केवळ तारखा देत आहेत. जखमेवर मीठ चोळण्याचे काम होत आहे. जर शुद्ध शास्त्रीय कारण, विज्ञानाला धरून माहिती देता असेल तर द्यावी. असो राज्यात अनेक विषय आहेत. असे असताना सहा खासदार फुटले केले. ज्यावेळी काँग्रेस व शरद पवार यांच्या सोबत मुख्यमंत्रीपदासाठी गेलेले उद्धव ठाकरे यांना त्यावेळी आपण कोणता निर्णय घेतात हे कळाले नाही. आपल्या वडीलांची कदापी सावलीला या पक्षाला उभे केले नाही. त्यांच्या मांडीला लावुन बसलात त्यावेळे निष्ठा, हिंदुत्व कोठे गेले. असा विचार कट्टर शिवसैनिक करणार नाहीत काय करणार? त्यामुळे शिवसेना आहे केवळ नावे वेगळी आहेत. एवढाच प्रश्न आहे. त्यामुळे जनतेनी या बाबत अधिक विचार न केलेला बरा. राज्यात काय देशात अनेक भयाण प्रश्न आहेत. महागाई गगणाला भिडली आहे. त्याची सर्वांनी सोडवणुक करावी. कोणत्या पक्षाचा आहे किंवा गेला यापेक्षा त्यांच्यात जनतेचे प्रश्न सोडविण्याची धमक, ताकद आहे का? या बाबीचा विचार करा. सहा लोकप्रतिनिधी या पक्षातून त्या पक्षात गेले. का गेले हे त्या पक्ष प्रमुखांनी केला पाहिजे. मोठ्या संख्येने आमदार फुटले त्यावेळी कोणते प्रयत्न केले? परत येण्याची विनंती केली नाही. प्रत्येकाला स्वाभीमान असतो. हे विसरून चालणार नाही. त्यामुळे सर्वांनी विचार करून चालले पाहिजे. टिका करून चालणार नाही. ज्यांनी शिवसेना संपविण्याचा विचार केला त्याला आवरले जात नाही. त्यामुळे जो नेता जनतेतून निवडला जातो तोच पक्ष मजबुत सांभाळू शकतो. आपल्यापुर्वजाच्या आशिर्वादाने पदे व सन्मान मिळाला असल्याने जे तळमळीने, दिर्घ काळ कष्टाने पक्षाला पुढे आणले ते आले त्यांचा सन्मान झाला पाहिजे. आज देशात भाजपाची ताकद वाढती आहे. दिर्घ काळ केंद्रात पंतप्रधानपद सांभाळले अशांना शिव्या घालता कशाला? आपण पुन्हा कट्टर हिंदुत्व स्विकारा. राज्यात असंख्य हिंदु आहेत त्यांना मदत, संरक्षण द्या. काँग्रेस किंवा राष्ट्रवादी सोबत जावून पक्षाची माती केली आहे ही साधी बाब लक्षात का येत नसावी? वास्तविक सहाजणांनी पक्षा बदलला तर आता उरले तीन! ही मोठी शरमेची बाब आहे. खासदार दूर केले आता आमदार ही दुर जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे आपले मुळ धोरण व पक्का विचार सोडू नका तर तीला पुन्हा सक्रिय करा. पुन्हा हिंदुऱ्हदयसम्राट बाळासाहेबांचे चिरंजीव म्हणून जवळ घेतील. आज विचार केला तर राज्यातील किती नगरपरिषदा, महानगरपालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समिती उद्धव ठाकरे यांच्याकडे आहेत. राज्यात किती आमदार सोबत आहे. एकीकाळी शिवसेनेचा मुख्यमंत्री होते. ज्यावेळी भाजपाची साथ सोडली व अमित शहा यांनी फटकारले त्यादिवसापासून उद्धव ठाकरे यांच्या पक्षाची स्थिती काय दर्शविते याचा विचार केला पाहिजे. एक चुक किती महागात पडू शकते हा अनुभव राज्यातील इतर पक्षांची विचार केला पाहिजे. आता राज्यातून किंवा देशातून भाजपाची माघार शक्य नाही. भाजपाला शह देणारा पक्ष असा दुसरा कोणताही मजबुत स्थितीत दिसून येत नाही. त्यामुळे राज्यात काँग्रेस, शरद पवार यांची राष्ट्रवादीची स्थिती काय दर्शविते. आता हे पुन्हा उभारी घेतीलच असे नाही. त्यामुळे उद्धव ठाकरे गटाने विचारपुर्वक पावले टाकली पाहिजे. काही दिवसासाठी परदेश दौऱ्यावर संजय राऊतांना पाठविले पाहिजे. तरच काही चांगले होवू शकेल. राज्यात उद्धव ठाकरे व त्यांचा पक्ष वाढला पाहिजे. अशी भावना जनतेची असली तरी ते ज्यांच्यात हिंदुत्व नाही किंवा कमी आहे अशांसोबती न जाणे काळाची गरज आहे. राज्यात आता दोन पक्षाला आगामी काळात जनता थारा देईलच असे वाटत नाही. त्यामुळे उद्धव ठाकरे यांनी गंभीरतेने विचारपुर्वक पावले टाकण्याची गरज आहे. जसे हिंदुत्व हिंदुऱ्हदयसम्राट बाळासाहेबांच्या अंगी होता तसे प्रयत्न उद्धवजींनी केला पाहिजे. केवळ आणि केवळ भाजपाची साथ सोडली. साथ सोडल्याने हाताला आलेली सत्ता गेली ही खंत दूर गेलेल्या शिवसैनिकात निर्माण होणे स्वाभाविक आहे व होते. त्यामुळे जे घडले ते घडले. आता एकनाथ शिंदे यांची माघार नाही ते ही हिंदुऱ्हदयसम्राट बाळासाहेब ठाकरे व आनंद दिघे यांच्या तालमीत तयार झालेले कट्टर शिवसैनिक आहेत हे विसरता येवू शकत नाही. तसे पाहिले तर सत्ता कोणाला नको, सत्ता सर्वांना हवी. ज्यांनी सत्ता भोगली त्यांना तर ती सोडू वाटत नाही ही एक मानसिकता आहे. त्यामुळे आज जे सहाजन दुसऱ्या सेनेत गेले त्यांना चांगले पद, मंत्रीपद मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याचा उपयोग ते जनतेच्या भल्यासाठी, कल्याणासाठी करतील यात शंका नाही. त्यामुळे या विषयावर पडदा टाकला पाहिजे. चर्चेला पुर्ण विराम दिला पाहिजे. जे घडले ते कोणाच्या चुकीमुळे घडले याचा विचार करून जनतेनी यात अधिक वेळ खर्च करणे योग्य नाही. राजकारण खरे नसते ही जुनी मंडळी म्हणते ते काही चुकीचे नाही!

# एकल महिलांसाठी स्वतंत्र धोरणासाठी सूचना आणि अभिप्राय पाठविण्याचे आवाहन

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील एकल महिलांना सन्मानपूर्वक, सुरक्षित आणि स्वावलंबी जीवन जगता यावे, यासाठी स्वतंत्र धोरण तयार करण्यात येत आहे. हे धोरण अधिक व्यापक, लोकाभिमुख आणि परिणामकारक करण्यासाठी राज्यातील एकल महिला, नागरिक, स्वयंसेवी संस्था, सामाजिक कार्यकर्ते, अभ्यासक, संशोधक आणि विषयतज्ज्ञ यांनी आपल्या सूचना व अभिप्राय ८२०८५८९१९५ या व्हॉट्सप क्रमांकावर पाठवावेत, असे आवाहन मुंबई उपनगर जिल्ह्याचे महिला व बालविकास अधिकारी शरद कुऱ्हाडे यांनी केले आहे.

एकल महिलांसमोरील समस्या केवळ मांडण्याऐवजी त्या सोडविण्यासाठी शासनाने कोणत्या ठोस उपाययोजना कराव्यात, कोणत्या नवीन योजना सुरू कराव्यात; तसेच विद्यमान योजनांमध्ये, कायद्यांमध्ये किंवा नियमांमध्ये कोणते बदल आवश्यक आहेत, याबाबत सविस्तर सूचना पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

अभिप्राय पाठविताना केवळ मत नोंदविण्याऐवजी संबंधित विषयाची पार्श्वभूमी, सुचविलेली उपाययोजना, संभाव्य लाभार्थी आणि अपेक्षित परिणाम यांचा समावेश असलेला सुस्पष्ट प्रस्ताव सादर करावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

एकल महिलांसाठी तयार होणारे धोरण अधिक प्रभावी आणि सर्वसमावेशक व्हावे, यासाठी समाजातील एकल महिला; तसेच सर्व संबंधित घटकांचा सक्रिय सहभाग महत्त्वाचा असल्याचे नमूद करून अधिकाधिक नागरिकांनी या प्रक्रियेत सहभागी व्हावे, असेही करण्यात आले आहे.

# एकदा खाल तर बाजारातील आमपापड विसरून जाल! घरच्या घरी बनवा ही भन्नाट रेसिपी

उन्हाळा आला की आंब्याचा हंगाम सुरू होतो आणि आंब्यापासून बनणाऱ्या विविध पदार्थांची चव चाखण्याची उत्सुकता वाढते. आंब्याचा रस, लोणचे, पन्हे यांसोबतच अनेकांच्या आवडीचा पदार्थ म्हणजे आमपापड. लहानपणी शाळेबाहेर किंवा किराणा दुकानात मिळणाऱ्या आंबट-गोड आमपापडाची चव आजही अनेकांच्या आठवणीत आहे.

बाजारात अनेक प्रकारचे आमपापड उपलब्ध असले तरी घरच्या घरी बनवलेला आमपापड अधिक चवदार आणि आरोग्यदायी असतो. कारण त्यामध्ये कोणतेही कृत्रिम रंग, फ्लेवर किंवा प्रिझर्व्हे टिव्ह वापरावे लागत नाहीत. विशेष म्हणजे हा पदार्थ बनवण्यासाठी खूप कमी साहित्य लागते आणि प्रक्रिया देखील सोपी आहे.

जर तुम्हाला आंब्याची चव दीर्घकाळ टिकवून ठेवायची असेल, तर घरगुती आमपापड हा उत्तम पर्याय ठरू शकतो. मुलांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनाच हा पदार्थ आवडतो. गोड, आंबट आणि थोड्या तिखट चवीचे अनोखे मिश्रण याला आणखी खास बनवते.

**आमपापड बनवण्यासाठी लागणारे साहित्य**

४ ते ५ पिकलेले आंबे
अर्धा कप साखर
१ चमचा काळे मीठ
अर्धा चमचा लाल तिखट
चिमूटभर भाजलेले जिरेपूड

जर आंबे खूप गोड असतील तर साखरेचे प्रमाण कमी करू शकता. मसाल्यांचा योग्य समतोल साधल्यास आमपापडाची चव आणखी खुलते.

**आमपापड बनवण्याची सोपी पद्धत**



सर्वप्रथम आंबे स्वच्छ धुऊन त्यांचा गर काढून घ्या. हा गर मिक्सरमध्ये फिरवून अगदी गुळगुळीत पल्प तयार करा.

यानंतर हा पल्प एका कढईत किंवा पॅनमध्ये घालून मंद आचेवर शिजवायला ठेवा. त्यामध्ये साखर घाला आणि मिश्रण सतत हलवत राहा. काही वेळाने मिश्रण घट्ट होऊ लागेल.

आता त्यात काळे मीठ, लाल तिखट आणि जिरेपूड घालून नीट मिसळा. मसाले व्यवस्थित एकजीव झाल्यावर गॅस बंद करा.

त्यानंतर स्टीलची ताटली किंवा ट्रे घ्या आणि त्याला हलकासा तुपाचा हात लावा. तयार मिश्रण त्यावर पातळ थरात समान पसरवा.

आता ही ताटली कडक उन्हात २ ते ३ दिवस वाळत ठेवा. मिश्रण पूर्णपणे कोरडे होईपर्यंत ते उन्हात ठेवणे आवश्यक आहे.

जर तुम्हाला जाड आमपापड आवडत असेल तर पहिला थर वाळल्यानंतर त्यावर पुन्हा एक पातळ थर लावून आणखी एक-दोन दिवस वाळवू शकता. यामुळे आमपापड अधिक जाड आणि चविष्ट बनतो.

**चव वाढवण्यासाठी खास टिप्स**

बाजारात मिळणाऱ्या आमपापडासारखी चटपटीत चव हवी असेल तर आमपापड पूर्ण वाळल्यानंतर त्यावर थोडे काळे मीठ, चाट मसाला आणि लाल तिखट भुरभुरवा.

काही जण मिश्रणात थोडासा लिंबाचा रसही घालतात. त्यामुळे आमपापडाला हलकी आंबट चव येते आणि ताजेपणाही वाढतो.

**साठवणूक कशी कराल?**

आमपापड पूर्णपणे वाळल्यानंतर त्याचे आवडीप्रमाणे चौकोनी किंवा लांब तुकडे करा. हे तुकडे हवाबंद डब्यात साठवून ठेवा.

ओलावा लागू न दिल्यास आमपापड अनेक महिने ताजा आणि चवदार राहू शकतो. मुलांच्या डब्यासाठी, प्रवासासाठी किंवा मधल्या वेळच्या खाण्यासाठी हा एक उत्तम आणि चविष्ट पर्याय आहे. घरच्या घरी बनवलेला हा आमपापड एकदा तयार करून पाहा. त्याची चव इतकी भन्नाट लागेल की बाजारातील आमपापड तुम्ही सहज विसरून जाल.

# करा कॅफेसारखी फेसाळ कोल्ड कॉफी; जाणून घ्या सोपी रेसिपी

उन्हाळ्यात थंड आणि ताजेतवाने पेयांची मागणी वाढते. अशा वेळी कोल्ड कॉफी हा अनेकांचा आवडता पर्याय असतो. लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनाच कोल्ड कॉफीची चव आवडते. कॅफेमध्ये मिळणारी फेसाळ, क्रीमी आणि स्वादिष्ट कोल्ड कॉफी पिण्यासाठी अनेक जण बाहेर जातात. मात्र, प्रत्येक वेळी कॅफेमध्ये जाणे खिशाला परवडणारे नसते. चांगली गोष्ट म्हणजे अगदी कॅफेसारखी कोल्ड कॉफी तुम्ही घरीही अवघ्या दोन मिनिटांत तयार करू शकता.

अनेकांना वाटते की कॅफे स्टाइल कोल्ड कॉफी बनवण्यासाठी महागडी उपकरणे किंवा भरपूर साहित्य लागते. पण प्रत्यक्षात काही मोजक्या वस्तूंच्या मदतीने तुम्ही घरच्या घरीच स्वादिष्ट कोल्ड कॉफी तयार करू शकता. दूध, कॉफी, साखर आणि बर्फ या साध्या पदार्थांपासून बनणारे हे पेय चवदार आणि ताजेतवाने करणारे असते.

घरच्या घरी बनवलेली कोल्ड कॉफी किफायतशीर तर असतेच, शिवाय आपल्या आवडीनुसार त्यात वेगवेगळे फ्लेवर्सही घालता येतात. चॉकलेट, व्हॅनिला किंवा कॅरमेल फ्लेवर वापरून तुम्ही कोल्ड कॉफीची चव अधिक खास बनवू शकता.

**कोल्ड कॉफीसाठी लागणारे साहित्य**

१ कप थंड दूध
१ चमचा इन्स्टंट कॉफी पावडर
२ चमचे साखर
५ ते ६ बर्फाचे तुकडे
आवडीनुसार चॉकलेट सिरप
अधिक क्रीमी चव हवी असल्यास १ स्कूप व्हॅनिला आईस्क्रीम वापरू शकता.

**कोल्ड कॉफी बनवण्याची सोपी पद्धत**

सर्वप्रथम ब्लेंडरमध्ये कॉफी पावडर, साखर आणि थोडेसे पाणी घालून एक ते दोन मिनिटे चांगले ब्लेंड करा. त्यामुळे मिश्रणाला क्रीमी टेक्स्चर येईल. हे मिश्रण एका बाटलीत भरून



फ्रीजमध्ये ठेवू शकता.

जेव्हा कोल्ड कॉफी बनवायची असेल तेव्हा एका ब्लेंडरमध्ये थंड दूध, बर्फाचे तुकडे आणि तयार केलेल्या कॉफी मिश्रणाचा एक चमचा घाला. हे सर्व साहित्य पुन्हा चांगले ब्लेंड करा. ब्लेंडिंगदरम्यान कॉफीमध्ये भरपूर फेस तयार होईल, ज्यामुळे तिला कॅफेसारखा लूक आणि चव मिळते.

**फेसाळ आणि क्रीमी कोल्ड कॉफीचे रहस्य**

जर तुम्हाला अधिक फेसाळ आणि क्रीमी कोल्ड कॉफी हवी असेल तर ब्लेंडिंगचा वेळ थोडा वाढवा. तसेच व्हॅनिला आईस्क्रीम किंवा थोडी व्हीप्ड क्रीम घातल्यास कॉफीचा पोत अधिक मऊ आणि समृद्ध होतो.

**सर्व्ह करण्याची आकर्षक पद्धत**

कोल्ड कॉफी अधिक आकर्षक दिसावी यासाठी ग्लासच्या आतील बाजूस चॉकलेट सिरपने डिझाइन काढा. त्यानंतर तयार कोल्ड कॉफी ग्लासमध्ये ओता. वरून चॉकलेट पावडर, कॉफी पावडर किंवा चॉकलेट चिप्स घालून सजावट करा. यामुळे पेयाची चव आणि सादरीकरण दोन्ही अधिक सुंदर दिसेल.

**चव वाढवण्यासाठी खास पर्याय**

दरवेळी एकाच चवीची कोल्ड कॉफी पिण्याऐवजी त्यात वेगवेगळे फ्लेवर्स वापरू शकता. व्हॅनिला एसेन्स, कॅरमेल सिरप, चॉकलेट सॉस किंवा हेजलनट फ्लेवर घालून तुम्ही कोल्ड कॉफीला नवा स्वाद देऊ शकता. त्यामुळे प्रत्येक वेळी वेगळ्या चवीचा आनंद घेता येईल. उन्हाळ्याच्या दिवसांत थंडगार, फेसाळ आणि क्रीमी कोल्ड कॉफीचा आनंद घ्यायचा असेल तर ही सोपी रेसिपी नक्की करून पाहा. कमी वेळात तयार होणारे हे पेय घरातील सर्वांच्या पसंतीस उतरेल.

# निरोगी महाराष्ट्राच्या दिशेने भक्कम वाटचाल

महाराष्ट्र शासनाने सार्वजनिक आरोग्य क्षेत्रात व्यापक परिवर्तन घडवून आणत 'निरोगी महाराष्ट्र, सक्षम महाराष्ट्र' या ध्येयाकडे भक्कम पावले टाकली आहेत. प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा, आधुनिक उपचार सुविधा, तंत्रज्ञानाधारित आरोग्य व्यवस्थापन, महिला व बाल आरोग्य संवर्धन, संसर्गजन्य व असंसर्गजन्य रोगांवरील नियंत्रण; तसेच लोकसहभागाच्या माध्यमातून राज्याची आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम होत आहे.

मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्या नेतृत्वाखाली आरोग्य सेवांचा विस्तार, गुणवत्तापूर्ण उपचार सुविधा आणि आरोग्य जनजागृती यावर विशेष भर देण्यात येत आहे. यामुळे ग्रामीण ते शहरी भागापर्यंत लाखो नागरिकांना आरोग्य सेवांचा लाभ मिळत आहे.

**लोकसहभागातून आरोग्य क्रांती**

राज्यातील प्रत्येक गाव निरोगी, स्वच्छ आणि आरोग्यदृष्ट्या सक्षम व्हावे या उद्देशाने 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' हा महत्त्वाकांक्षी उपक्रम राबविण्यात येत आहे. ग्रामपंचायत, आशा सेविका, आरोग्य कर्मचारी, युवक मंडळे आणि ग्रामस्थ यांच्या सक्रिय सहभागातून गावागावात आरोग्यदायी वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न होत आहे.आरोग्य हा केवळ उपचारांचा विषय नसून लोकचळवळ बनावी, या दृष्टीने हा उपक्रम राज्यभर प्रभावीपणे विस्तारत आहे.

**नागरी आरोग्य सेवांचे सक्षम जाळे**

राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानांतर्गत राज्यात ८१७ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे,४३ नागरी सामुदायिक आरोग्य केंद्रे, १९०४ आयुष्यमान आरोग्य मंदिरे, ६७५ हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाने कार्यरत आहेत.शहरी भागातील नागरिकांना त्यांच्या परिसरातच दर्जेदार प्राथमिक आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यात या यंत्रणांची महत्त्वपूर्ण भूमिका आहे.

**महिला आरोग्याला नवी दिशा**

महिलांच्या आरोग्य संवर्धनासाठी राबविण्यात आलेल्या 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' अभियानाला राज्यभर उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.या अभियानांतर्गत २.३५ लाखांहून अधिक आरोग्य शिबिरे,१.१३ कोटींहून अधिक महिलांची तपासणी करण्यात आली.उच्च रक्तदाब, मधुमेह, स्तन कर्करोग, गर्भाशय मुखाचा कर्करोग, रक्तक्षय यांसारख्या आजारांचे लवकर निदान करून महिलांना उपचार व समुपदेशन सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या.महिलांच्या रजोनिवृत्तीनंतर उद्भवणाऱ्या आरोग्य समस्यांवर लक्ष केंद्रित करण्यासाठी राज्यातील जिल्हा आणि उपजिल्हा रुग्णालयांमध्ये मेनोपॉज क्लिनिक सुरू करण्यात आली आहेत.

**माता व बाल आरोग्यात आघाडी**

माता व बाल आरोग्य क्षेत्रात महाराष्ट्राने देशासाठी आदर्श निर्माण केला आहे.एसआरएस-२०२३ अहवालानुसार नवजात मृत्युदर - ११, अर्भक मृत्युदर - १४, पाच वर्षांखालील बालमृत्युदर - १६ इतका कमी झाला आहे. भारताने २०३० पर्यंत साध्य करण्याचे उद्दिष्ट ठेवलेले मानांकन महाराष्ट्राने आधीच गाठले आहे. राज्यातील विशेष नवजात शिशुकाळजी कक्ष, पोषण पुनर्वसन केंद्रे आणि स्तनपान व्यवस्थापन केंद्रांमुळे बाल आरोग्य सेवांना मोठे बळ मिळाले आहे.

दोन कोटींहून अधिक बालकांची आरोग्य तपासणी. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत एप्रिल २०२५ ते फेब्रुवारी २०२६ या कालावधीत २.१३ कोटींहून अधिक बालकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. हजारो बालकांवर हृदय शस्त्रक्रिया व इतर जीवनरक्षक उपचार करून त्यांना नवजीवन देण्यात आले.

**प्रभावी लसीकरण मोहिम**

राज्यात नियमित लसीकरणाचे ९२ टक्के उद्दिष्ट साध्य झाले आहे.बालकांना विविध संसर्गजन्य आजारांपासून संरक्षण देण्यासाठी व्यापक लसीकरण मोहीम राबविण्यात येत आहे. गर्भाशय मुखाच्या कर्करोगापासून संरक्षणासाठी एचपीव्ही लसीकरण मोहिमेलाही चांगला प्रतिसाद मिळत आहे.

**आधुनिक उपचार ग्रामीण भागातही**

अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा ग्रामीण व निमशहरी भागात उपलब्ध व्हाव्यात यासाठी २३ नवीन कार्डियाक कॅथलॅब,लिथोट्रिप्सी सुविधा,अत्याधुनिक निदान सेवा उपलब्ध करून देण्याचे काम सुरू आहे. तसेच शासकीय रुग्णालयांमध्ये अनेक तपासण्या आणि उपचार मोफत उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

**क्षयरोगमुक्त महाराष्ट्राकडे वाटचाल**

राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत राज्यात व्यापक प्रमाणात निदान, उपचार आणि पोषण सहाय्य सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.२०२५ मध्ये शोधण्यात आलेल्या क्षयरुग्णांपैकी ८८ टक्के रुग्ण उपचारानंतर बरे झाले आहेत. 'टीबी मुक्त भारत' अभियानाला महाराष्ट्रातून उत्साहवर्धक प्रतिसाद मिळत आहे.

**संसर्गजन्य रोगांवर प्रभावी नियंत्रण**

मलेरिया, डेंग्यू, चिकुनगुनिया, कुष्ठरोग, हत्तीरोग आणि रेबीज यांसारख्या आजारांवर नियंत्रण मिळवण्यासाठी राज्यभर विशेष मोहिमा राबविण्यात येत आहेत.स्थानिक स्वराज्य संस्था, आरोग्य कर्मचारी आणि नागरिक यांच्या सहभागामुळे या मोहिमांना प्रभावी यश मिळत आहे.

**पॅलिएटिव्ह केअर आणि मानवी स्पर्श**

कर्करोग आणि इतर गंभीर आजारांनी ग्रस्त रुग्णांना सन्मानाने जीवन जगता यावे यासाठी राज्यातील ३४ जिल्ह्यांमध्ये पॅलिएटिव्ह केअर सेवा उपलब्ध करण्यात आल्या आहेत.घरभेटी, समुपदेशन, वेदना नियंत्रण आणि दूरवैद्यकीय सेवा यांमुळे हजारो कुटुंबांना आधार मिळत आहे.

**रक्तदानात महाराष्ट्र देशात अव्वल**

राज्यात २०२५ मध्ये २३.६९ लाख युनिट रक्त संकलित झाले असून त्यापैकी ९९.५८ टक्के रक्तदान स्वैच्छिक स्वरूपाचे आहे. रक्तदान चळवळीत महाराष्ट्राने पुन्हा एकदा देशात अग्रस्थान कायम राखले आहे.

**सिकलसेलमुक्त महाराष्ट्रासाठी 'अरुणोदय'**

सिकलसेल ॲनिमिया निर्मूलनासाठी राज्यातील २१ जिल्ह्यांमध्ये 'अरुणोदय' अभियान राबविण्यात येत आहे.तपासणी, समुपदेशन आणि जनजागृतीच्या माध्यमातून या आनुवंशिक आजाराविरुद्ध व्यापक लढा उभारण्यात आला आहे.

**निरोगी महाराष्ट्राचे स्वप्न साकारतेय**

आधुनिक आरोग्य सुविधा, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, प्रशिक्षित मनुष्यबळ, महिला व बाल आरोग्यावरील विशेष भर, संसर्गजन्य रोग नियंत्रण आणि लोकसहभाग यांचा समन्वय साधत महाराष्ट्र आरोग्य क्षेत्रात नवे मानदंड निर्माण करीत आहे. ग्रामीण ते शहरी भागापर्यंत प्रत्येक नागरिकाला दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देत राज्य शासन 'निरोगी महाराष्ट्र, सक्षम महाराष्ट्र' या ध्येयाच्या दिशेने आत्मविश्वासाने वाटचाल करीत आहे. लोकसहभाग, आधुनिक आरोग्य सेवा आणि सुजाण नागरिक यांच्या बळावर निरोगी महाराष्ट्राचे स्वप्न आता वास्तवात उतरू लागले आहे.

००००

**दत्तात्रय कोकरे**
**विभागीय संपर्क अधिकारी**
**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय मंत्रालय मुंबई.**

# तेल संकटात दिलासा

अमेरिकेसोबत नुकत्याच स्वाक्षरी केलेल्या सामंजस्य करारानंतर ६० दिवसांच्या वाटाघाटीच्या कालावधीनंतर २ महिन्यांत होर्मुझमधून जाणार्या जहाजासाठी सागरी वहन शुल्क लागू करण्याचा विचार इराणने व्यक्त केला आहे.

अमेरिका आणि इराण यांच्यातील शांतता करार म्हणजे दोन देशांतील सहमती असली, तरी अमेरिकेने इराणवर लादलेल्या अटी शिथिल झाल्याने भारतापुढे निर्माण झालेल्या तेल संकटात दिलासा मिळाला आहे. त्याचा प्रत्यक्ष फायदा म्हणजे तेल भरलेली जहाजे भारताच्या दिशेने रवाना झाली आहेत. करारावर सह्या झाल्यानंतर होर्मुझच्या सामुद्रधुनीतून १.२५ कोटी पिंपे तेलाची वाहतूक करण्यात आल्याचे वृत्तही तेलसंकटाच्या दृष्टीने भारताला हायसे वाटणारे आहे. करारावर स्वाक्षर्या झाल्यानंतर तात्काळ प्रभावाने होर्मुझची सामुद्रधुनी खुली झाली आहे. त्यामुळे भारताला ऊर्जा सुरक्षा, स्वस्त इंधनाची उपलब्धता आणि त्यामुळे आर्थिक आघाडीवर दिलासा मिळण्यास मदत होणार आहे. या जलमार्गातून भारताच्या एकूण गरजेपैकी ४० ते ५० टक्के तेल आणि ५० टक्क्याहून अधिक नैसर्गिक वायू आयात होतो. होर्मुझची सामुद्रधुनी खुली झाल्याने इंधन आयातीचा खर्च कमी होण्याची शक्यता आहे. होर्मुझ बंद असल्याने भारतात येणार्या जहाजांना आफ्रिकेला वळसा घालून यावे लागत होते. मार्ग खुला झाल्याने समुद्री अंतर कमी होऊन वाहतूक खर्चात बचत होईल. इंधन आयातीचा खर्च कमी झाल्याने भारताच्या परकीय चलनाच्या साठ्यावरील ताण कमी होऊन आंतरराष्ट्रीय बाजारात रूपया तग धरू शकेल. भारतात खत निर्मिती मुख्यतः एलएनजी गॅसवर अवलंबून आहे. गॅसचा पुरवठा सुरळीत झाल्याने देशांतर्गत खताच्या किमती आटोक्यात येतील अशी अपेक्षा आहे. अर्थात देशात इंधनाचे दर लगेचच कमी होण्याची शक्यता नसली तरी इंधनाच्या किमती आणखी वाढणार नाही अशी अपेक्षा आहे. मार्च-एप्रिल मध्ये अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्या संघर्षात होर्मुझ खुली ठेवण्यावरून मतभेद झाल्यानंतर आणि अमेरिकेने काही नियंत्रणे आणल्यानंतर खनिज तेलाच्या किमती वाढल्या. आंतरराष्ट्रीय बाजारात खनिज तेलाच्या किमती प्रति पिंपामागे शंभर डॉलरपेक्षा अधिक होण्याची भीती होती, ती होर्मुझ खुली झाल्याने आता टळली आहे.



**तात्काळ प्रभाव अशक्य**

पश्चिम आशियातील बदलत्या परिस्थितीच्या अनुषंगाने भारताच्या पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या प्रवक्त्याने परवा दिलेली माहिती दिलासा देणारी आहे. करार दृष्टिक्षेपात आल्यानंतर गेल्या तीन दिवसांत १.३६ कोटी एलपीजी सिलिंडरची मागणी नोंदवण्यात आली असताना १.४७ कोटी गॅस सिलिंडर ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यात आले आहेत. देशात पेट्रोल, डिझेल आणि घरगुती वापराच्या गॅसची पुरेशी उपलब्धता असल्याची ग्वाहीदेखील मंत्रालयाच्या संयुक्त सचिवांनी पत्रकार परिषदेत दिली आहे. गेले तीन महिने तेल वाहतुकीच्या जहाजांना मार्ग खुला नसल्याने वाहतूक विस्कळीत झाली होती, त्याचाही परिणाम पेट्रोल-डिझेल आणि गॅसच्या दरवाढीवर झाला होता. अर्थात हे संकट पूर्णतः टळले असे म्हणता येत नाही. युद्धबंदी असूनही होर्मुझमधून जहाजांची वाहतूक युद्धपूर्व पातळीपेक्षा कमीच आहे. खनिज तेलाच्या किमतीही अद्याप पूर्वपदावर आलेल्या नाहीत. खनिज तेल ८० डॉलर प्रति पिंपापेक्षा खाली आले तरी युद्धापूर्वीचा ६५ ते ७० डॉलर प्रति पिंप होण्यास आणखी वेळ लागू शकतो. भारताची ५० टक्क्याहून अधिक तेल आयात पश्चिम आशियातून होते. भारताचा तेल पुरवठा प्रामुख्याने होर्मुझमार्गे होणार्या पुरवठ्यावरच अवलंबून आहे. जागतिक बाजारात खनिज तेलाचे दर कमी होत असले तरी भारतात पेट्रोल-डिझेलच्या किरकोळ दरात लगेचच मोठी कपात होण्याची शक्यता नाही. याचे कारण तेल कंपन्या अजूनही तोटा होत असल्याचीच ओरड करीत आहेत आणि इंधन कंपन्यांचे पूर्वीचे नुकसान भरून काढण्याचे कारण सरकार त्यासाठी देत आहे. फेब्रुवारीमध्ये इराण-अमेरिका युद्ध सुरू झाल्यानंतरही पाच राज्यांतील निवडणुकांमुळे सरकारने इंधन किमती स्थिर ठेवल्या. त्याचा परिणाम सरकारी तिजोरीवरील बोजा १२ हजार कोटींनी वाढला होता. तेलाच्या संकटातून भारताची सुटका झाली असली तरी धोका पूर्णतः संपलेला नाही असेच म्हणावे लागेल.

# मधुमेहाच्या रुग्णांनी पायांची काळजी घेताना

मधुमेहाच्या रुग्णांनी पायांची विशेष काळजी घेणे अत्यंत गरजेचे आहे. रक्तातील साखर वाढल्यामुळे पायांच्या नसा कमजोर होतात (न्यूरोपॅथी) आणि रक्तप्रवाह मंदावतो. यामुळे साध्या जखमा किंवा ओरखडे देखील गंभीर रूप घेऊ शकतात.खाली दिलेल्या टिप्सचे पालन करून तुम्ही पायांचे रक्षण करू शकता:१. दैनंदिन स्वच्छता आणि तपासणी (ऊळश्रू उश्रशरपळपस खपीशिलींळेप)पाय धुवा: रोज कोमट पाण्याने आणि सौम्य साबणाने पाय स्वच्छ धुवा. पाय धुताना पाणी जास्त गरम नसावे.कोरडे करा: पाय धुतल्यानंतर मऊ टॉवेलने पुसून पूर्णपणे कोरडे करा. पायाच्या बोटांमधील जागा कोरडी असणे अत्यंत आवश्यक आहे, कारण ओलाव्यामुळे बुरशीजन्य संसर्ग (ऱ्र्रीपसरश्र खपषशलींळेप) होऊ शकतो.तपासणी करा: रोज न चुकता पायांच्या तळव्यांची, टाचांची आणि बोटांमधील भागांची तपासणी करा. कोणत्याही प्रकारची जखम, लालसरपणा, किंवा फोड दिसल्यास त्वरित डॉक्टरांशी संपर्क साधा. तळवा पाहण्यासाठी आरशाचा वापर करू शकता.२. त्वचेची निगा (डज्ञळपलरीश)मॉइश्चरायझर: त्वचा कोरडी पडल्यास भेगा पडून रक्त येऊ शकते.



# कुरळ्या केसाच्या मैत्रिणींचा मेनटेन ब्रॅण्ड

दी लेडी बॉस: अर्चना सोंडे



शारिरीक व्यंगावरून एखाद्याला चिडवणं हे आपल्याकडे सहज घडणारी क्रिया म्हणून पाहिलं जातं. त्या दोघींना तर त्यांच्या कुरळ्या केसांवरून चिडवलं जायचं. कुरळे केस म्हणजे नसती आफत त्यांना वाटली होती. मात्र त्यांना वाटणाऱ्या या 'आफत'ने त्यांना कोटींची उलाढाल करणाऱ्या उद्योगाची उद्योजिका बनवले. ही गोष्ट आहे 'मेनटेन (चरपशींरळप) स्टोअर प्रा.लि.'च्या संचालिका युबा रोमीन आगा आणि हिनशरा मानदथ हबीब यांची. कुरळे केस असलेल्या दोन महिला, युबा आणि हिनशरा या दोघी सुद्धा कुरळ्या केसांच्या. कुरळ्या केसांच्या व्यक्तींनी तयार केलेल्या व्हॉट्सप ग्रुपच्या माध्यमातून या दोघींची ओळख झाली.

युबा मुंबईमध्ये लहानाची मोठी झाली. तिने होली क्रॉस हायस्कूलमध्ये शिक्षण घेतले आणि नंतर तिने २००८ मध्ये नवी मुंबईच्या डॉ. डी. वाय. पाटील डेंटल स्कूल आणि हॉस्पिटल मधून दंत वैद्यकशास्त्राची पदवी संपादन केली. हिनशरा ही कोची येथील एका व्यापारी कुटुंबातील आहे. तिने माध्यमिक शिक्षण कोचीच्या राजगिरी पब्लिक स्कूलमध्ये पूर्ण केले, तर तामिळनाडूच्या निलगिरी येथील लॉरेन्स स्कूलमधून १२वी पूर्ण केली. त्यानंतर तिने क्राइस्ट युनिव्हर्सिटी, बंगळूरु येथून वाणिज्य शाखेची पदवी प्राप्त केली. ती डेलॉइट या बहुराष्ट्रीय कंपनीमध्ये ऑडिट असिस्टंट म्हणून काम करत होती. २०१८ मध्ये त्यांनी प्रत्येकी ३०,००० रुपये गुंतवून केसांची निगा राखणारा 'मेनटेन' हा ब्रँड सुरू केला.

युबाचे शिक्षण विज्ञान शाखेतून झाल्यामुळे उत्पादनांबद्दलच्या सुरुवातीच्या संशोधनात तिला फायदा झाला. २०१६-१७ मध्ये कुरळ्या केसांची निगा राखणारी उत्पादने युबाला सापडली जी भारतात उपलब्ध नव्हती. तिला ते अमेरिका किंवा इंग्लंडमधून मागवावे लागत, ज्यामध्ये बरेच शिपिंग शुल्क होते आणि ते खूप महागदेखील होते. जेव्हा युबाला भारतीय बाजारपेठेत कुरळे केसांच्या उत्पादनांची कमतरता जाणवली तेव्हाच तिने अशी उत्पादने भारतात निर्माण करण्याचा निश्चय केला.खरं तर युबाला तिच्या कॉलेजच्या दिवसांमध्ये, केसांमुळे खूप छेडछाड आणि उपहासाचा सामना करावा लागला. ती जेव्हा कार्यक्रम किंवा महोत्सवामध्ये कुरळे केस दाखवण्याचा प्रयत्न करायची, तेव्हा लोक खोडकर कमेंट्स करायचे. तिच्या हायस्कूलच्या दिवसातील एक प्रसंग आहे. एका लेक्चरमध्ये शिक्षकांनी त्यांचा लहान कंगवा गंमतीने युबाच्या डोक्यावर ठेवला आणि म्हटले की, मी हा कंगवा तुझ्या डोक्यात घालण्याचा प्रयत्न केला तर? मी तो पुन्हा शोधू शकणार नाही! सारा वर्ग हसायला लागला. मात्र याचा युबाला खूप राग आला होता. ती मनातून दुखावली सुद्धा होती.जेव्हा युबा आणि हिनशरा यांनी कुरळे केसांची उत्पादने बनवण्याचा निर्णय घेतला, तेव्हा त्यांनी क्सेसरीजपासून सुरुवात केली. त्यांनी त्यांच्या स्वतःच्या गरजा आणि वैयक्तिक अनुभवावर आधारित विविध उत्पादनांची श्रेणी तयार केली आहे. त्यांनी एका स्थानिक शिंपीला गाठले. रेशीम आणि सॅटिनपासून बनवलेल्या केसांच्या उपकरणांची रचना तयार केली. ऑक्टोबर २०१८ मध्ये, त्यांनी इन्स्टाग्रामद्वारे 'मेनटेन' लाँच केले. पुढे त्यांनी फ्लेक्ससीड्सपासून बनवलेली केसांची टोपी सादर केली, ज्याला उत्कृष्ट प्रतिसाद मिळाला. मेनटेन हे केस आणि हीट कॅप्स, स्क्रंचीज आणि केसांची काळजी घेणारी उत्पादने बनवते, ज्यामध्ये मॉइश्चरायझिंग शैम्पू, कंडिशनर, क्लॅरिफायिंग शैम्पू आणि को-वॉश यांचा समावेश आहे. या दोघी पहिल्यापासून कुरळे केस असलेल्या व्यक्तींच्या व्हॉट्सप समुदायाचा भाग असल्याने, त्यांना ग्राहक मिळवण्यासाठी जास्त दूर जावे लागले नाही. त्यांना सुरुवातीला मिळालेला प्रतिसाद जबरदस्त होता. मेनटेनचे उत्पादन १५० रुपयांपासून सुरू होते. सर्वांत महागडे उत्पादन हे २,२४० रुपयांपर्यंत जाते.पहिल्याच आर्थिक वर्षात, सहा महिन्यांपेक्षा कमी कालावधीत त्यांनी २० लाख रुपयांची उलाढाल केली होती. मेनटेनला वेबसाइटद्वारे विक्रीतील ६०%, ॲमेझॉन, फ्लिपकार्ट आणि इतर तत्सम प्लॅटफॉर्मसारख्या तृतीय-पक्षाच्या वेबसाइटद्वारे ३०% आणि सॅलोनसोबत भागीदारीद्वारे १०% उत्पन्न मिळते. व्यावसायिक मॉडेल्स वापरण्याऐवजी युबा आणि हिनशरा स्वतःची उत्पादने स्वतःच प्रदर्शित करतात. ते पाहून ग्राहक त्यांच्या प्रामाणिकपणाकडे आकर्षित होतात. ब्रँडबद्दलचा त्यांचा आत्मविश्वास आणि समर्पणाचा हा पुरावा आहे. हे केवळ विपणनासाठी नाही, तर आपण जे ग्राहकांना जे देणार आहे, त्यावर मनापासून विश्वास ठेवण्याबद्दल आणि त्याच्या पाठीमागे दृढ विश्वासाने उभे राहण्याबद्दल आहे. युबाचे रोमीन आगा या व्यावसायिकाशी लग्न झाले असून रिदान हा ११ वर्षांचा मुलगा आणि आयशा व अमीर ही ६ वर्षांची जुळी मुले आहेत. हिनशराचा कोचीमध्ये पीव्हीसी पाइप्सचे उत्पादन करणारा कौटुंबिक व्यवसाय आहे. ती त्यातदेखील सहभाग घेते. शार्क टँक इंडियाच्या अमन गुप्ता यांनी गेल्या वर्षी ७५ लाख रुपयांची मेनटेनमध्ये गुंतवणूक केली होती. मेनटेनने १.१४ कोटी रुपयांची उलाढाल केली आहे. कोचीची हिनशरा आणि मुंबईची युबा यांच्यामध्ये १२ वर्षांचे अंतर आहे. हिनशरा २५ वर्षांची आहे, तर युबा ३७. मात्र वयाचा फरक असूनही त्यांच्यामध्ये एक उत्तम भावबंध निर्माण झालेला आहे. त्या एक कुटुंब म्हणून काम करतात. वेगवेगळ्या शहरांत राहूनसुद्धा परस्पर विश्वास आणि एकमेकांबद्दल असलेला आदर हा युबा आणि हिनशरा यांच्यामधील पाया आहे. या पायावरच 'मेनटेन'चा डोलारा उभा आहे.

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा



या सर्व उपचारामुळे हा त्रास दूर केला जातो. नाहीतर औषधे देण्यात येतात. तरी परिणाम हाती येत नसल्यास शल्यचिकित्सा केली जाते.तरी या आजाराबद्दल महिला जागरूक नाहीत. बऱ्याच स्त्रिया हे सामान्य लक्षण असल्याचा विचार करून डॉक्टरांकडे जात नाही. पण वेळीच ह्याचे निदान न केल्यास हा आजार गंभीर होऊ शकतो. यासाठी गरज आहे की स्त्रियांनी लाज न बाळगता डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. यावर उचित औषधोपचार करावं. हा एक सामान्य आजार असून उपचार करणे देखील सोपे आहे.

## २ Joke विनोद




**आई : अरे बाळू, छोटी का रडतेय.**
**बाळू : अगं, तिला अंगणात हौद खणून हवाय.**
**आई : मग दे की खणून.**
**बाळू : दिला खणून पण ती म्हणतेय आता तो घरात आण.**

## ३ Message संदेश



Santa: tumne us aadmi ko aisa kyu maara?
Banta: usne mujhe poocha ke "Khaana khaaye kya"?
Santa: arey, bhala hi poocha hai na. phir kyu maara?


## ४ Thought सुविचार



आत्म्यामुळेच आपले जीवन उदात्त होते.
- सिनेका

**संस्कृत सुभाषित**
अनिशश्चावमानी च स शीघ्रंभ्रश्यते श्रिय:।।
(सौप्तिकपर्व, अध्याय २, ोक २५, महाभारत)
अर्थ - हातात सत्ता नसतानाही जो दुसऱ्याचा उपमर्द करतो तो ऐश्वर्यापासून लवकरच भ्रष्ट होत

# मनोरंजक महाशब्दकोडे



## आडवे शब्द

१. आराम करण्याचे सणवार? (वाक्प्रचार)
१०. छोटे कुबड
१२. पुरुष
१३. निवासस्थान
१४. रमापती
१५. जेमतेम, मोठ्या मुष्किलीने
१७. एक पालेभाजी
१९. कामावर बहिष्कार
२०. आंब्याचे रोप
२२. भीती, वचक
२३. अकस्मात, पूर्वकल्पना नसताना
२४. शिऱ्यातील प्रमुख पदार्थ
२५. निपचिप
२७. नशीब, काम
२८. फजिती, टवाळी
३०. प्रयत्न
३१. रममाण, निमग्न
३२. काम टाळणारा
३४. रेशमी धोतर
३७. घाण पाणी
४०. विनंती
४२. गर्व, ताठा
४३. रोगप्रतिबंधक द्रव
४५. गारा
४६. वानवा, उणीव
४८. घराची सजावट
५०. विद्यार्थ्यांचे राहण्याची जागा
५२. वैताग, नाकी आणलेला दम!
५४. पंख
५६. खून, वध
५८. बोलविणे
५९. अपवित्र
६२. सहाय्य
६४. सूर्याचा मंत्र
६५. परिस्थितीला अचानक मिळालेले वळण
६६. छाटणे
६७. आश्चर्य
६८. कर भरण्याची योग्यता
७०. दुर्लक्ष, हेळसांड
७२. चिक्कू माणूस
७३. नवीन
७४. लोकांचे राज्य
७६. साईबाबांची उक्ती
७९. मोठे गाव
८०. अवलोकन
८१. नजरफेक

## उभे शब्द

१. सूर्य
२. उत्तराधिकार
३. प्रत्येक वर्ष
४. श्रीरामाचे एक नाव
५. पराभव
६. पचनास सहाय्य करणार पदार्थ
७. गुन्हा
८. पूर्ण भरतीचे वेळ
९. उद्धट, अरेरावी करणारा मनुष्य
११. गुरांचा जमाव
१६. निरर्थक बडबड
१७. गडीमाणसे
१८. वरपांगी
१९. संभाव्य धोका
२१. हिंदीतील आढेवेढे
२२. दोरा
२४. कांती, तेज
२६. ऱ्हास
२९. जीभ
३०. पंतप्रधान
३३. कावळ्याचे ओरडणे
३५. करुणा, कीव
३६. भांडण
३८. वर्तमानपत्रातील कप्पा
३९. सभेची जागा
४१. रानभूल
४४. जळाऊ लाकूड
४६. पुष्कळ
४७. वाहून नेणे
४८. कायदा-सुव्यवस्थेला जबाबदार मंत्री
४९. खंदक
५१. मनाला टोचणारे दुःख
५३. श्रेष्ठ-कनिष्ठ असा भेदाभेद
५५. अलमारी
५७. मीठ (हिंदी)
५८. जमाखर्च
५९. गटार
६०. भरपूर मार देणे, चोपणे (वाक्प्रचार)
६१. 'गपापा' होणारा ऐवज!
६३. तुकडी, पाकळी
६५. कोलकाताचे जुने नाव
६७. डोळे,६९. संकटातून पार करणारा
७०. निराश
७१. मोठा आवाज
७३. अपऱ्या नाकाचा
७५. पडसे,७६. च्या बरोबर
७७. प्रेम की पैसा?
७८. पहिला आकडा

## आडवे उत्तर

१.दिवाळी दसरा हातपाय पसरा १०.पोक १२.नर १३.घर १४.रमावर १५.कसाबसा १७.चाकवत १९.संप २०.कलम २२.धाक २३.अचानक २४.रवा २५.गपगार २७.कर्म ३०.प्रयास ३१.रत ३२.चुकार ३४.कद ३७.नरकवणी ४०.याचना ४२.नक्षा ४३.लस ४५.कारका ४६.अभाव ४८.गृहरचना ५०.वसतिगृह ५२.वात ५४.पर ५६.हनन ५८.आमंत्रण ५९.नापाक ६२.मदत ६४.गायत्री ६५.कलाटणी ६६.कलम ६७.नवल ६८.करपात्रता ७०.हयगय ७२.कद्रू ७३.नव ७४.जनसत्ता ७६.सबका मालिक एक ७९.शहर ८०.पाहणे ८१.कटाक्ष

## उभे उत्तर

१.दिनकर २.वारसा ३.दरसाल ४.राघव ५.हार ६.पाचक ७.परत ८.समा ९.रावणाचा लेक ११.कळप १६.बकवास १७.चाकरचुकर १८.वरकरणी १९.संकट २१.मगर २२.धागा २४.रया २६.पतन २९.रसना ३०.प्रधानमंत्री ३३.कावकाव ३५.दया ३६.कलह ३८.रकाना ३९.सभागृह ४१.चकवा ४४.सरपण ४६.अति ४७.वहन ४८.गृहमंत्री ४९.चर ५१.सल ५३.तरतमभाव ५५.कपाट ५७.नमक ५८.आयव्यय ५९.नाला ६०.कणीक तिंबणे ६१.हपापाचा माल ६३.दल ६५.कलकत्ता ६७.नयन ६९.तारक ७०.हताश ७१.गजर ७३.नकटा ७५.सर्दी ७६.सह ७७.माया ७८.एक



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### टीम इंडियाने फायनलला श्रीलंकेचा माज उतरवला

मुंबई–दाम्बुला इंटरनेशनल स्टेडिअमवर पार पडलेल्या सामन्यात टीम इंडियाने श्रीलंकेचा ६६ धावांनी पराभव करत फायनलचा सामना जिंकला. टीम इंडिया अ ने प्रथम फलंदाजी करताना ३७७ धावा केल्या होत्या. या लक्ष्याचा पाठलाग करताना श्रीलंका अ फक्त ३११ वर ऑलआऊट झाली.त्यामुळे टीम इंडियाने हा सामना ६६ धावांनी जिंकला होता.या विजयासह टीम इंडियाच्या खेळाडूंनी वैभव सूर्यवंशीचा बदला घेतला आहे.टीम इंडियाने दिलेल्या ३७७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना श्रीलंकेची सूरूवात चांगली झाली नव्हती.कारण अविष्का फरांडो ३ तक निरोशन डिकवाला २५ आणि नुवानिंदू फरनांडो २१ वर बाद झाला.हे तीन विकेट पार पडल्यानंतर श्रीलंकेचा डाव अडचणीत सापडला होता. त्याच्यानंतर सदीरा समराविक्रमा आणि कॅप्टन सहन अराचिंगे मैदानात आले होते. यावेळी सदीराने ५२ धावांची खेळी केली. त्याच्यानंतर रविंदु फरनांडो १९ वर बाद झाला. त्यानंतर कॅप्टन सहन अराचिंगे देखील ३८ वर बाद झाला. श्रीलंकेच्या ६ विकेट पडल्यानंतर ते सामना लगेच हारतील असे वाटत होते.पण वानुजा सहन आणि वियासकांथने श्रीलंकेचा डाव सावरला होता. दोघांनी मिळून श्रीलंकेला विजयाशी आशा दाखवली होती.

### वैभव सूर्यवंशीच्या संघाने श्रीलंकेला लोळवलं!

मुंबई–श्रीलंकेमध्ये खेळवण्यात आलेल्या ट्राय सिरीजचा आज फायनलचा सामना पार पडला, या सामन्यात भारताच्या संघाने बाजी मारली. या सामन्यामध्ये वैभव सूर्यवंशीने भारतीय संघाला फलंदाजीमध्ये चांगली सुरुवात करुन दिली. तर टीम इंडियाचा युवा गोलंदाज यश ठाकुरने पहिल्या तीन फलंदाजांना बाद केल्यानंतर गोलंदाजीमध्ये देखील भारताच्या संघाने कहर केला. या सामन्यात भारताच्या संघाने श्रीलंकेला ६६ धावांनी पराभूत करुन मालिकेचे विजेतेपद नावावर केले आहे. या सामन्यात भारताच्या संघाने मागील सामन्यातील बदला घेतला असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. या सामन्यात भारतीय संघाची कामगिरी कशी राहिली यासंदर्भात सविस्तर वाचा.
भारत अ विरुद्ध श्रीलंका अ यांच्यामध्ये झालेल्या सामन्यात श्रीलंकेने नाणेफेक जिंकले, यात श्रीलंकेच्या कर्णधाराने नाणेफेक जिंकून पहिले गोलंदाजी करण्याचा निर्णय श्रीलंकेला चांगलाच महागात पडला. या सामन्यात भारताच्या सलामीवीरांनी श्रीलंकेच्या गोलंदाजांना पहिल्या डावाच्या सुरुवातील गुडघे टेकायला भाग पाडले होते. वैभव सूर्यवंशी आणि प्रियांश आर्या यांनी संघासाठी दमदार कामगिरी केली.

### भारतीय ‘अ’ संघाने श्रीलंकेला पराभूत करत तिरंगी मालिका जिंकली

दंबुल्ला (श्रीलंका) –१५ वर्षीय वैभव सूर्यवंशीच्या स्फोटक ९४ धावांच्या खेळीमुळे इंडिया मअफ संघाने अंतिम सामन्यात श्रीलंका मअफसंघाला ६६ धावांनी पराभूत करून तिरंगी मालिकेचे विजेतेपद पटकावले. सूर्यवंशीच्या अवघ्या २९ चेंडूंतील ९४ धावांनी सामन्याच्या सुरुवातीच्या षटकांमध्येच सामन्याची दिशा ठरवली. प्रथम फलंदाजी करताना इंडिया मअफसंघाने ५० षटकांत नऊ गडी गमावून ३७७ धावांचा डोंगर उभा केला. प्रत्युत्तरात, श्रीलंका मअफसंघ ३११ धावांवर सर्वबाद झाला. भारतासाठी यश ठाकूर (३४५) आणि विप्राज निगम (३६०) यांनी उत्कृष्ट गोलंदाजी केली. वैभव सूर्यवंशीने अंतिम सामन्यासारख्या मोठ्या सामन्यात आपले कौशल्य दाखवले. त्याने अवघ्या ११ चेंडूंमध्ये आपले अर्धशतक पूर्ण करून लिस्ट मअफ क्रिकेटमधील सर्वात जलद अर्धशतकाचा विक्रम प्रस्थापित केला. यापूर्वी हा विक्रम श्रीलंकेच्या कौशल्या वीरारत्ने यांच्या नावावर होता, ज्यांनी २००५ मध्ये १२ चेंडूंमध्ये अर्धशतक झळकावले होते. सूर्यवंशीच्या पहिल्या ११ चेंडूंमधील धावा अशा होत्या:

### भारतीय महिला हॉकी संघाला नेशन्स कपचे विजेतेपद

ऑकलंड–भारतीय महिला हॉकी संघाने एफआयएच हॉकी नेशन्स कप २०२६ जिंकला आहे. अंतिम सामन्यात भारताने यजमान न्यूझीलंडचा २–० असा पराभव करून एक मोठा विजय नोंदवला. ऑकलंडमध्ये खेळल्या गेलेल्या या सामन्यात भारतीय हॉकीपटूंनी सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ केला आणि प्रतिस्पर्धी संघाला पुनरागमन करण्याची कोणतीही संधी दिली नाही. न्यूझीलंड भारताच्या आव्हानासमोर टिकूच शकले नाही.जागतिक क्रमवारीत ९ व्या क्रमांकावर असलेल्या भारताने १० व्या क्रमांकावर असलेल्या न्यूझीलंडला हरवले. या सामन्यात नवनीत कौर (चौथ्या मिनिटाला) आणि सुनीलिता टोप्पो (१५ व्या मिनिटाला) यांनी गोल करून भारताला विजेतेपद मिळवून दिले.अंतिम सामन्यात लालरेम्सियामी हमारजातेला मप्लेअर ऑफ द मॅचफपुरस्कार मिळाला, तर दीपिकाने सहा गोल करून अमेरिकेच्या ॲसेसासोबत संयुक्तपणे सर्वाधिक गोल करण्याचा मान मिळवला.भारताचे हे दुसरे एफआयएच नेशन्स कप विजेतेपद आहे. नवनीत कौरने सामन्यातील पहिला पेनल्टी कॉर्नर गोलमध्ये

## ६ धुरंधर खेळाडू बाहेर, बुमराहचे कमबॅक, पण विराटचे काय?

मुंबई–भारतीय संघाच्या आगामी इंग्लंड दौऱ्याला पुढील महिन्यापासून म्हणजेच १ जुलैपासून सुरुवात होत आहे. या दौऱ्यात सुरुवातीला ५ सामन्यांची टी–२० मालिका खेळवली जाईल, ज्यानंतर १४, १६ आणि १९ जुलै रोजी ३ सामन्यांची एकदिवसीय मालिका रंगणार आहे. या अत्यंत महत्त्वाच्या वनडे मालिकेसाठी बीसीसीआयने भारतीय संघाची घोषणा केली असून, गेल्या मालिकेच्या तुलनेत संघात मोठे फेरबदल पाहायला मिळत आहेत.
६ दिग्गज खेळाडू संघाबाहेर
फेब्रुवारी २०२५ मध्ये भारतामध्ये झालेल्या इंग्लंडविरुद्धच्या शेवटच्या वनडे मालिकेच्या तुलनेत यंदाच्या संघातून तब्बल ६ दिग्गज खेळाडूंना डच्चू देण्यात आला आहे. यामध्ये यशस्वी जैस्वाल, ऋषभ पंत, हार्दिक पांड्या, मोहम्मद शमी, वरुण चक्रवर्ती आणि रवींद्र जडेजा या स्टार खेळाडूंचा समावेश आहे.
शतक ठोकूनही यशस्वी जैस्वाल बाहेर!
निवड समितीचा सर्वात धक्कादायक निर्णय युवा फलंदाज यशस्वी जैस्वालबाबत राहिला. अफगाणिस्तानविरुद्धच्या तिसऱ्या वनडे सामन्यात शानदार शतक झळकावूनही त्याला इंग्लंड दौऱ्यासाठी संघात स्थान मिळालेले नाही. दुखापतग्रस्त विराट कोहलीचा पर्याय म्हणून जयस्वालला



अफगाणिस्तानविरुद्ध संधी मिळाली

होती, मात्र आता विराटच्या पुनरागमनामुळे यशस्वीला संघाबाहेर जावे लागले आहे. जैस्वालसोबतच युवा फिरकीपटू हर्ष दुबे आणि वेगवान गोलंदाज प्रिन्स यादव यांनाही संघात स्थान टिकवता आले नाही. अफगाणिस्तानविरुद्ध छाप पाडणाऱ्या या खेळाडूंपेक्षा सिलेक्टर्सनी अनुभवी खेळाडूंना प्राधान्य दिले आहे.
विराट, बुमराह आणि अक्षर पटेलचे पुनरागमनइंग्लंडविरुद्धच्या या दौऱ्यासाठी अनुभवी फलंदाज विराट कोहली आणि मुख्य वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह यांचे संघात पुनरागमन झाले आहे. तसेच, २०२७ च्या वनडे वर्ल्ड कपच्या दृष्टीने अक्षर पटेलला पुन्हा संघात बोलावण्यात आले आहे. तरुण गोलंदाज हर्षित राणा आणि गुरनूर ब्रार यांनी आपले स्थान कायम राखले आहे, तर शुभमन गिलकडे संघाचे कर्णधारपद सोपवण्यात आले आहे.
इंग्लंड दौऱ्यासाठी असा आहे भारतीय संघ –शुभमन गिल (कर्णधार), रोहित शर्मा, विराट कोहली, श्रेयस अय्यर (उपकर्णधार), केएल राहुल (यष्टीरक्षक), इशान किशन (यष्टीरक्षक), वॉशिंग्टन सुंदर, अक्षर पटेल, नितीश कुमार रेड्डी, कुलदीप यादव, जसप्रीत बुमराह, प्रसिद्ध कृष्णा, हर्षित राणा, अर्शदीप सिंग, गुरनूर ब्रार.

## पाकिस्तानचा वर्ल्डकपमधून पत्ता कट! महिला विश्वचषकातून दोन संघ बाहेर

मुंबई–महिला टी२० विश्वचषक २०२६ चा सध्या इंग्लंडमध्ये सुरु आहे, यामध्ये भारताच्या संघाचा पहिला सामना हा पाकिस्तानविरुद्ध पार पडला आणि तर दुसरा सामना हा नेदरलॅन्डविरुद्ध खेळवण्यात आला. या दोन्ही सामन्यात भारतीय संघाने एकतर्फी विजय मिळवला. टीम इंडियाचा २१ जून रोजी तिसरा सामना खेळवला जाणार आहे, याआधी महिला टी२० विश्वचषकातून आता दोन संघ बाहेर झाले आहेत. आतापर्यत स्पर्धेचे अर्धेच सामने झाले आहेत आणि पाकिस्तानचा संघ स्पर्धेतून बाहेर पडला आहे. पाकिस्तानच्या पराभवामुळे आणखी एक संघ स्पर्धेतून बाहेर झाला आहे. आता स्पर्धेतील समीकरण काय आहे यासंदर्भात सविस्तर जाणून घ्या.
भारताचा संघ हा गट अ मध्ये आहे या गट अ मधील दोन संघाचा आता प्रवास संपला आहे. दोन्ही संघाचे दोन सामने शिल्लक असतानाही दोन्ही संघ हे आता उपांत्य फेरीच्या शर्यतीमधून बाहेर झाले आहेत.
पाकिस्तान आणि नेदरलँड्स हे दोन्ही संघ स्पर्धेमधून बाहेर झाले आहेत, या दोन्ही संघाचे दोन सामने शिल्लक आहेत पण ते पुढील फेरीमध्ये गुणांमुळे जाऊ शकणार



नाहीत. पाकिस्तान आणि नेदरलँड्स या दोन्ही संघांनी आतापर्यत तीन सामने खेळले आणि या तीनही सामन्यामध्ये त्यांना पराभवाचा सामना करावा लागला.
२० जून रोजी विश्वचषकाचे तीन सामने खेळवण्यात आले, यामध्ये नेदरलँड्सच्या संघाला ऑस्ट्रेलियाने मोठ्या फरकाने पराभूत केले. पहिल्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने नेदरलँड्सला ९८ धावांनी हरवून पुढील फेरीत जाण्याची आपली आशा जवळपास निश्चित केली. तर दुसऱ्या सामन्यामध्ये पाकिस्तान आणि बांग्लादेश यांच्यामध्ये सामना झाला या सामन्यात बांग्लादेशने पाकिस्तानला पराभूत केले. आता आजचा सामना भारतीय संघासाठी महत्वाचा असणार आहे. त्यामुळे भारतीय महिला संघ या सामन्यामुळे पुढील फेरीत जाण्यासाठी जागा पक्की करु शकते. ऑस्ट्रेलियाचा संघ हा उपांत्य फेरीसाठी जवळपास पात्र ठरला आहे, भारताचा संघ गुणतालिकेमध्ये गट अ मध्ये दुसऱ्या स्थानावर आहे. बांग्लादेशचा संघ तिसऱ्या स्थानावर आणि दक्षिण आफ्रिका चौथ्या स्थानावर आहे. पाकिस्तान आणि नेदरलँड्स यांचे प्रत्येकी दोन सामने अजून बाकी आहेत, परंतु उपांत्य फेरीतील पात्रता चार गुणांवर ठरेल असे वाटत नाही.

## ४ ओपनर अन् ३ स्पिनर....

### भारताच्या टी२० संघात झाले बदल, ‘या’ स्टार गोलंदाजाला संधी

मुंबई–भारतीय क्रिकेट संघ हा जून महिन्यात आयर्लंड दौऱ्यावर जाणार आहे. २६ आणि २८ जून रोजी भारत विरुद्ध आयर्लंड यांच्यात टी२० सीरिज खेळवली जाणार असून त्यासाठी काही दिवसांपूर्वी संघाची घोषणा करण्यात आलेली होती. मात्र ४ दिवसांवर आलेल्या या सीरिजपूर्वी बीसीसीआयने टीम इंडियात बदल केले आहेत. गोलंदाज वरुण चक्रवर्ती याची टी२० सीरिजसाठी भारतीय संघात निवड करण्यात आलेली, मात्र दुखापतीच्या कारणामुळे तो संघातून बाहेर पडला असून त्याच्या ऐवजी नुकत्याच फिट झालेल्या हर्षित राणाला संधी देण्यात आलेली आहे. याशिवाय आयपीएल २०२६ मध्ये कमाल करणारे २ नवीन खेळाडू भारतीय संघाकडून पदार्पण करुस शकतील.
श्रेयसच्या नेतृत्वात खेळणार टीम इंडिया : श्रेयस अय्यर हा टीम इंडियाचा नवीन टी२० कर्णधार झाला असून त्याच्या नेतृत्वात भारतीय संघ दोन सामन्यांची टी२० सीरिज आयर्लंडमध्ये खेळेल. त्यानंतर पुढच्या वर्षी त्यांना इंग्लंड दौरा सुद्धा करायचा आहे. यावेळच्या आयर्लंड दौऱ्यात टीम इंडियात ४ ओपनर असून यात अभिषेक शर्मा, संजू सॅमसन (विकेटकीपर), ईशान किशन (विकेटकीपर) आणि वैभव सूर्यवंशी यांचा समावेश आहे. तर तीन स्पिनर अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर आणि रवि बिष्णोई हे असणार आहेत. शिवम दुबे आणि नीतीश कुमार रेड्डी हे ऑलराउंडर म्हणून तर वेगवान गोलंदाज म्हणून हर्षित राणा, अर्शदीप सिंह आणि प्रिंस यादव यांचं नाव आहे.
कधी होणार आयर्लंड दौरा?
आयर्लंडविरुद्ध दोन सामन्यांची टी२० सीरीज होणार आहे. पहिला सामना २६ जूनला आणि दुसरा सामना २८ जूनला खेळवला जाईल. इंग्लंडविरुद्धच्या पाच सामन्यांच्या टी२० सीरीजपूर्वी हे दोन्ही सामने होणार आहेत. आयर्लंड दौऱ्यात भारतीय संघाच्या ’प्लेइंग इलेव्हन’मध्ये युवा खेळाडूंना स्थान मिळू शकते.
आयर्लंड विरुद्ध टी२० सीरिजसाठी भारतीय संघ :
श्रेयस अय्यर (कर्णधार), अभिषेक शर्मा, संजू सॅमसन (विकेटकीपर), ईशान किशन (विकेटकीपर), शिवम दुबे, तिलक वर्मा (उपकर्णधार), नीतीश कुमार रेड्डी, अक्षर पटेल, वाशिंगटन सुंदर, रवि बिश्नोई, हर्षित राणा, अर्शदीप सिंह, प्रिंस यादव, वैभव सूर्यवंशी, प्रसिद्ध कृष्णा.
पहिल्यांदा आयर्लंड दौरा करणार ’हे’ युवा खेळाडू :
वैभव सूर्यवंशी आणि प्रिंस यादव या दोन्ही खेळाडूंनी आयपीएलमध्ये उत्तम कामगिरी केली. या दोघांना सुद्धा पहिल्यांदाच भारताच्या टी२० मध्ये संघात निवडण्यात आले. ही पहिलीच वेळ आहे जेव्हा हे दोन्ही खेळाडू आयर्लंडच्या भूमीवर टीम इंडियासोबत खेळून आपली जादू दाखवतील. वैभव त्याच्या आक्रमक फलंदाजीसाठी प्रसिद्ध आहे, तर प्रिन्स यादव त्याच्या घातक गोलंदाजीसाठी ओळखला जातो. वैभवने आयपीएल २०२६ मध्ये १६ सामन्यांत ४८.५० च्या सरासरीने एकूण ७७६ धावा करत ऑरेंज कॅप मिळवली, तर प्रिन्सने १४ सामन्यांत १४ विकेट घेतले. त्याने विराट कोहलीसारख्या दिग्गज खेळाडूलाही ’क्लीन



## इंग्लंड विरुद्ध वनडे सीरिजसाठी टीम इंडियाची घोषणा! रोहित – विराटची जोडी पुन्हा मैदानात दिसणार

मुंबई–जुलै महिन्यात भारताचा वरिष्ठ पुरुष क्रिकेट संघ हा इंग्लंड दौऱ्यावर जाणार आहे. याठिकाणी ते वनडे आणि टी२० सीरिज खेळणार आहेत. बीसीसीआयने यापूर्वीच भारत विरुद्ध इंग्लंड टी२० सीरिजसाठी भारतीय संघाची घोषणा केली होती. आता रविवार २१ जून रोजी इंग्लंड दौऱ्यात होणाऱ्या वनडे सीरिजसाठी भारतीय संघाची घोषणा झाली आहे. यात भारताचा स्टार क्रिकेटर विराट कोहलीचं भारतीय संघात पुनरागमन झालं आहे.
अफगाणिस्तान विरुद्ध झालेल्या वनडे सीरिजमध्ये सुद्धा विराटचा भारतीय संघात समावेश होता. मात्र हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीने ग्रस्त असल्याने विराट या सीरिजला मुकला आणि त्याच्या ऐवजी यशस्वी जयस्वालला संधी मिळाली होती. मात्र आता विराट कोहली संघात परतणार असल्याने विराट आणि रोहित या दिग्गज फलंदाजांची जोडी प्रेक्षकांना पुन्हा मैदानात पाहायला मिळेल.
इंग्लंड दौऱ्यासाठी भारतीय संघ (वनडे सीरिज)
भारतीय संघ : श्रेयस अय्यर (कर्णधार), अभिषेक शर्मा, संजू सॅमसन (विकेटकिपर), इशान किशन (विकेटकिपर), शिवम दुबे, टिळक वर्मा (उपकर्णधार), नितीश कुमार रेड्डी, अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर, रवी बिश्नोई, हर्षित राणा, अर्शदीप सिंग, प्रिन्स यादव, वैभव कृष्णा, प्रिन्स यादव
भारत विरुद्ध इंग्लंड (वनडे सीरिज) वेळापत्रक :
भारत विरुद्ध इंग्लंड – १४ जुलै – पहिला वनडे सामना – ३: ३० दुपारी
भारत विरुद्ध इंग्लंड – १६ जुलै – दुसरा वनडे सामना – ५: ३० दुपारी
भारत विरुद्ध इंग्लंड – १९ जुलै – तिसरा वनडे सामना – ३: ३० दुपारी



वरून चक्रवर्ती संघातून बाहेर :भारत विरुद्ध इंग्लंड यांच्यात होणाऱ्या टी२० सीरिजसाठी भारतीय संघात वरुण चक्रवर्तीचा समावेश करण्यात आलेला. मात्र वरून चक्रवर्ती दुखापतीच्या कारणामुळे संघातून बाहेर पडला आहे. आयपीएल २०२६ दरम्यान वरुणच्या पायाला दुखापत झालेली, त्यानंतर बीसीसीआयच्या रिहॅब सेंटरमध्ये त्याच्यावर उपचार सुरु असून तो लवकरच बरा होईल. मात्र १ जुलै पासून सुरु होणाऱ्या इंग्लंड विरुद्ध टी२० सीरिजमध्ये तो खेळू शकणार नाही. बीसीसीआयने अद्याप त्याची रिप्लेसमेंट जाहीर केलेली नाही.

## कीवींनी इंग्रजांना २५३ धावांनी जिंकली

लंडन –इंग्लंड आणि न्यूझीलंड क्रिकेट संघातील तीन सामन्यांच्या कसोटी मालिकेतील दुसरा सामना लंडनच्या केनिंग्टन ओव्हलवर खेळला गेला. पाहुण्या कीवी संघाने सामन्याच्या पाचव्या दिवशी २५३ धावांनी हा सामना जिंकला. या विजयामुळे न्यूझीलंडनं मालिकेत १–१ अशी बरोबरी केली आणि जागतिक कसोटी चॅम्पियनशिप २०२५–२७ च्या गुणतालिकेत आपली गुणांची टक्केवारीही सुधारली. सामना सुरु होण्यापूर्वी सातव्या क्रमांकावर असलेला इंग्लंड, एक टक्केवारी गुण (झ्ऊ) गमावून त्याच स्थानावर कायम आहे.न्यूझीलंड चौथ्या स्थानावर कायम, ऑस्ट्रेलिया गुणतालिकेत अव्वल स्थानी : सध्याच्या जागतिक कसोटी चॅम्पियनशिप २०२५–२७ च्या गुणतालिकेत ऑस्ट्रेलिया अव्वल स्थानी आहे, ज्यांनी या चक्रात खेळलेल्या आठपैकी सात सामने जिंकले आहेत आणि एक

## ९४ धावांच्या खेळीत गोलंदाजांना दिवसा दाखवले तारे

### वैभव सुर्यवंशीची श्रीलंकेत दहशत

## ’’ही आयपीएल नाही’’ म्हणत डिवचणाऱ्या श्रीलंकेला वैभवने दाखवला इंगा!

मुंबई–१५ वर्षीय वैभव सूर्यवंशीने भारत अ आणि श्रीलंका अ यांच्यातील तिरंगी मालिकेच्या अंतिम सामन्यात वादळी कामगिरी केली. एका अनुभवी फलंदाजासारखी खेळी खेळत या १५ वर्षीय खेळाडूने आपल्या बॅटच्या जोरावर श्रीलंकन खेळाडूंना उत्तर दिलं. त्याची ही खेळी इतकी प्रभावी होती की, ’’ही काही आयपीएल नाही,’’ अशी टिप्पणी करण्याची हिंमत श्रीलंकेचे खेळाडू कदाचित पुन्हा कधीच करणार नाहीत.
डंबुला येथे सुरू असलेल्या अंतिम सामन्यात वैभवने केवळ २९ चेंडूंत अशी धडाकेबाज खेळी करत श्रीलंकन गोलंदाजांना त्याने दिवसा तारे दाखवले. अंतिम सामन्यात वैभवचा सामना करणाऱ्या श्रीलंकेच्या संघातील गोलंदाजांची त्याने चांगलीच धुलाई केली. आपल्या फलंदाजीने गोलंदाजीचा समाचार घेत वैभवने केवळ विश्वविक्रमच मोडला नाही, तर सर्वाधिक षटकार मारून आपल्या या मालिकेतील कामगिरीची सांगता केली.
श्रीलंका ’अ’ विरुद्धच्या अंतिम सामन्यात वैभव सूर्यवंशीने अवघ्या २९ चेंडूंत ९४ धावांची विक्रमी खेळी केली. या खेळीदरम्यान त्याने १० चौकार आणि ८ षटकार लगावले. फलंदाजीसाठी मैदानात उतरल्यावर त्याने सुरुवातीच्या षटकातील शेवटचे दोन चेंडू खेळले आणि सलग दोन चौकार मारून आपले खाते उघडले. त्यानंतर बाद झाल्यावरच वैभवचे वादळ थांबले.
वैभवसोबत फलंदाजीसाठी आलेल्या प्रियांश आर्यने प्रामुख्याने त्याला ’स्ट्राइक’ मिळवून देण्याचे काम केले. म्हणूनच, आपल्या खेळीतील सुरुवातीच्या ६४ धावा करताना वैभवने एकही धाव (सिंगल) घेतली नाही; त्याने त्या सर्व धावा चौकार आणि षटकारांच्या मदतीनेच केल्या. त्याची ६५ वी धाव मात्र ’सिंगल’ने आली. वैभवची फलंदाजीची शैली पाहता, तो क्रीझवर किती घातक ठरला होता, याची कल्पना येते.
तिरंगी मालिकेदरम्यान श्रीलंका अ विरुद्धच्या मागील दोन सामन्यांत वैभवची कामगिरी निराशाजनक होती; त्या दोन डावांत त्याने केवळ ३५ धावा केल्या होत्या. भारत अ आणि श्रीलंका अ यांच्यातील दुसऱ्या सामन्यात तर मैदानावर हाणामारी झाली होती. सुपर ओव्हरमध्ये त्या सामन्याचा निकाल लागला होता, ज्यात भारताला पराभव पत्करावा लागला होता. त्या सुपर ओव्हरमध्ये फलंदाजीसाठी वैभवच मैदानात उतरला होता. जेव्हा त्याला सामना जिंकून देण्यात अपयश आलं, तेव्हा ’श्रीलंका अ’च्या खेळाडूंनी त्याला डिवचत अभिमानाने म्हटलं, ’’ही काही आयपीएल नाही.’’ त्यानंतर वैभवने त्यांच्याशी वाद घालत धक्काबुक्की केली होती.
वैभव सूर्यवंशीने अगदी पहिल्या चेंडूपासूनच ’श्रीलंका अ’ संघाच्या गोलंदाजांवर जोरदार हल्ला चढवला. त्याने सुरुवातीला मोहम्मद शिराजचा सामना केला, ज्याने मालिकेतील पहिल्या सामन्यात त्याची विकेट घेतली होती,नपरंतु सूर्यवंशीचा आक्रमक पवित्रा इतका जबरदस्त होता की, कर्णधाराला शिराजला गोलंदाजीवरून थांबवावे लागले. सूर्यवंशीने शिराजच्या केवळ ८ चेंडूंवर ३४ धावा कुटल्या; या कामगिरीमुळे त्याला सर्वात जलद अर्धशतकाचा जागतिक विक्रम करण्यास मदत झाली.



## आषाढी यात्रेसाठी एसटीच्या ५,५०० विशेष बसेस - परिवहन मंत्री प्रताप सरनाईक



**मुंबई/प्रतिनिधी:** पंढरपूरच्या दिशेने निघालेल्या लाखो वारकऱ्यांच्या सेवेसाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची एसटी यंदाही सज्ज झाली आहे. आषाढी एकादशी यात्रेनिमित्त राज्यभरातून श्रीक्षेत्र पंढरपूरकडे जाणाऱ्या भाविकांच्या सुरक्षित, सुलभ आणि सुखकर प्रवासासाठी एसटी महामंडळाने ५ हजार ५०० विशेष बसेस सोडण्याचे नियोजन केले आहे. राज्यातील कोणत्याही गावातून ४० किंवा त्यापेक्षा अधिक भाविकांनी एकत्रित मागणी केल्यास त्या गावातून थेट पंढरपूरसाठी विशेष एसटी बस उपलब्ध करून दिली जाणार आहे, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

आषाढी यात्रेदरम्यान लाखो वारकरी पालख्यांसह पायी, रेल्वेने, खासगी वाहनांनी आणि एसटीने पंढरपूरकडे प्रस्थान करतात. या भाविकांच्या सेवेला सर्वोच्च प्राधान्य देत एसटी महामंडळाने व्यापक नियोजन केले आहे. भाविकांनी आपल्या जवळच्या एसटी आगाराशी संपर्क साधून विशेष बसची नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे या विशेष बस सेवेत शासनाच्या सर्व प्रवासी सवलती कायम राहणार आहेत. ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना 'अमृत ज्येष्ठ नागरिक योजना' अंतर्गत मोफत प्रवास, तर महिलांना 'महिला सन्मान योजना' अंतर्गत तिकीट दरात ५० टक्के सवलत दिली जाणार आहे.

मागील वर्षी आषाढी यात्रेसाठी एसटीने ५,२०० विशेष बसेस चालवून तब्बल २१ लाख ९५ हजार भाविकांची सुरक्षित ने-आण केली होती. यंदा त्याहून अधिक सक्षम नियोजन करण्यात आले आहे.

वारीदरम्यान रात्रंदिवस सेवा बजावणारे चालक, वाहक, यांत्रिक कर्मचारी, पर्यवेक्षक आणि अधिकारी यांच्यासाठी मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्वखर्चाने चहा, नाश्ता आणि भोजनाची व्यवस्था केली आहे. सुमारे १३ हजार कर्मचारी या सुविधेचा लाभ घेणार आहे.

एकादशीच्या दिवशी लाखो भाविक परतीच्या प्रवासाला निघत असल्याने वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी एसटीचे ३६ हून अधिक वाहतूक नियंत्रक आणि सुरक्षा रक्षक स्थानिक पोलीस प्रशासनासोबत कार्यरत राहणार आहेत. त्यामुळे वाहतूक नियोजन अधिक प्रभावी होऊन भाविकांचा प्रवास सुलभ होणार आहे.

भाविकांची गर्दी लक्षात घेऊन पंढरपूर येथे चंद्रभागा, भीमा (देगाव), विठ्ठल कारखाना आणि पांडुरंग (आयटीआय महाविद्यालय) अशी चार तात्पुरती बस स्थानके उभारण्यात येणार आहेत. या स्थानकांवर पिण्याचे पाणी, सुलभ शौचालय, संगणकीय आरक्षण केंद्र, चौकशी कक्ष, मार्गदर्शन फलक आणि इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

राज्यभरातील भाविकांनी एसटीच्या सुरक्षित, विश्वासार्ह आणि लोकाभिमुख सेवांचा लाभ घेत विठुरायाच्या दर्शनाचा आनंद घ्यावा, असे आवाहन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले आहे. वारकऱ्यांची सेवा हीच विठ्ठलाची सेवा या भावनेतून एसटी यंत्रणा संपूर्ण यात्राकाळात अहोरात्र सेवेसाठी तत्पर राहणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

## सौ. प्रतिभा रामराव काळे यांना महाराष्ट्र शासनाचा 'जिजामाता कृषी भूषण पुरस्कार २०२३' जाहीर



**लातूर/प्रतिनिधी:** जिच्या हाती पाळण्याची दोरी, तीच आज झाली जिजामाता कृषी भूषणची मानकरी! या उक्तीचा प्रत्यय देणारी अभिमानास्पद बाब म्हणजे सौ. प्रतिभा रामराव काळे यांना महाराष्ट्र शासनाचा प्रतिष्ठेचा 'जिजामाता कृषी भूषण पुरस्कार २०२३' (लातूर विभाग) जाहीर झाला आहे.

सौ. प्रतिभा रामराव काळे आणि त्यांचे पती श्री. रामराव काळे यांनी गेली अनेक वर्षे प्रामाणिकपणे, जिद्दीने आणि अथक परिश्रमाने शेतीची जोपासना केली आहे. आंबा बाग तसेच विविध फळबागांचे त्यांनी सेंद्रिय पद्धतीने संवर्धन करत शेतीला एक वेगळी दिशा दिली आहे. आपल्या बागेतील रसाळ आणि दर्जेदार फळे नातेवडांना तसेच घरी येणाऱ्या पाहुण्यांना प्रेमाने खाऊ घालणे हा त्यांचा आवडता छंद असून, शेतीविषयीचे त्यांचे प्रेम आणि निसर्गाशी असलेली नाळ आजही तितकीच दृढ आहे.

त्यांच्या या अविरत परिश्रमांची, निष्ठेची आणि सेंद्रिय शेतीतील उल्लेखनीय कार्याची दखल घेत महाराष्ट्र शासनाने त्यांना 'जिजामाता कृषी भूषण पुरस्कार २०२३' जाहीर करून गौरविले आहे. हा पुरस्कार जाहीर झाल्याने काळे कुटुंबासह परिसरात आनंदाचे वातावरण असून, शेतकरी वर्गातून त्यांचे अभिनंदन होत आहे.त्या भाजपा नेते तथा मराठवाडा संयोजक नितीन काळे यांच्या मातोश्री आहेत. याबाबत प्रतिक्रिया व्यक्त करत भाजपा नेते नितीन काळे यांनी सांगितले की, आई-वडिलांनी आयुष्यभर कष्ट, प्रामाणिकपणा आणि शेतीप्रती असलेली निष्ठा जपली. त्यांच्या कार्याचा सन्मान महाराष्ट्र शासनाने केल्याने आमच्या संपूर्ण कुटुंबासाठी हा अत्यंत अभिमानाचा आणि आनंदाचा क्षण आहे. त्यांची कृषी क्षेत्रातील सेवा आणि जीवनमूल्ये आम्हा सर्वांसाठी प्रेरणादायी आहेत.

सौ. प्रतिभा रामराव काळे यांना जाहीर झालेल्या या प्रतिष्ठेच्या पुरस्काराबद्दल विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# 'श्री अंबाबाई मंदिर परिसर व कॉरिडॉर' विकासासाठी १५०० कोटींचा निधी- केंद्रीय मंत्री अमित शाह

**कोल्हापूर/प्रतिनिधी:** दक्षिण भारताची काशी म्हणून ओळखले जाणारे करवीर निवासिनी श्री अंबाबाई (महालक्ष्मी) मंदिर तब्बल १५०० कोटी रुपयांच्या निधीतून खर्च करून हा परिसर विकास कॉरीडॉर म्हणून विकसित करण्यात येणार आहे, ही बाब सर्व भाविकांसाठी अत्यंत अभिमानास्पद असल्याचे प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केले.



पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर आयोजित कृतज्ञता सोहळा सभेत ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री तथा पालकमंत्री प्रकाश आबिटकर, उच्च व तंत्रशिक्षण चंद्रकांत (दादा) पाटील, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले, नगर विकास राज्यमंत्री तथा कोल्हापूरच्या सहपालकमंत्री माधुरी मिसाळ, राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर, माजी मंत्री रवींद्र चव्हाण खासदार सर्वश्री धनंजय महाडिक, धैर्यशील माने, आमदार सर्वश्री डॉ. विनय कोरे, डॉ.राजेंद्र पाटील-यड्रावकर, अमल महाडिक, चंद्रदीप नरके, डॉ.अशोकराव माने, शिवाजी पाटील, निरंजन डावखरे, जिल्हा परिषद अध्यक्ष शिल्पा खोत,महापौर रुपाराणी निकम, माजी आमदार प्रकाश आवाडे आदी मान्यवर उपस्थित होते.

केंद्रीय मंत्री श्री. शाह म्हणाले, ७ व्या शतकातील असलेल्या या प्राचीन मंदिराच्या परिसरातील सुमारे ४१ छोट्या-मोठ्या मंदिराचे संरक्षण करून येथील परिसर पुढील ६ महिन्याच्या आत विकसित करण्यात येणार आहे. या ठिकाणी अन्नछत्र सुरू करण्याबाबत आपण सकारात्मक असल्याचे सांगितले. आपल्या वारशाचे, संस्कृतीचे जतन, संवर्धन करणे आणि त्याला चालना देणारे हे शासन असल्याचे स्पष्ट केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कारकीर्दीत आर्थिक, संरक्षण, सुरक्षा या सर्वच क्षेत्रात झालेल्या प्रगतीची मांडणी करताना देशातील घुसखोरांना अत्यंत बारकाईने शोधून काढण्यात येईल असा इशारा त्यांनी दिला. तसेच देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात ग्रामीण व शहरी भागातील विकास गतीने सुरू असल्याचेही श्री शाह म्हणाले.

**कोल्हापूर सहकाराची पंढरी – मुख्यमंत्री श्री. फडणवीस**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले , पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देशाची अध्यात्मिक व सांस्कृतिक शक्ती पुनर्जीवित होत आहे. या परिसराचा विकास करण्याचा आग्रह केंद्रीय गृहमंत्र्यांनी आग्रह धरला होता. राज्यातील ५ जोतिर्लिंगासह कोल्हापूर जिल्ह्यातील जोतिबा तीर्थक्षेत्राचाही विकास सुरु आहे. भाविकांसाठी या आराखड्यातून पुढील शंभर वर्षात सेवा करता येईल, असे व्यापक काम राज्य शासनाने हाती घेतले आहे. कोल्हापूर शहर हे केवळ शक्तिपीठ अथवा अध्यात्माची पंढरी नाही तर ती सहकाराची आद्य पंढरी असल्याचे सांगितले.केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या कणखर नेतृत्वात देशाची वेगळी ओळख निर्माण झाली असून त्यांनी सहकार क्षेत्रात अतुलनीय कार्य केल्याचे गौरोद्गार मुख्यमंत्र्यांनी काढले. तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, येथील मंदिर परिसरातील आधुनिकीकरण व सुशोभीकरणाच्या कामाला आज प्रारंभ झाला आहे. हे काम पूर्ण झाल्यानंतर कोल्हापूर एक वेगळ्या उंचीवर जाईल. महाराष्ट्राने संपूर्ण देशाला अध्यात्मिक व सांस्कृतिक क्षेत्रात वेगळी ओळख दिली आहे.अमित शाह हे अतिशय कणखर गृहमंत्री असून देशातील नक्षलवाद संपवण्याचे काम केंद्रीय गृहमंत्रालयाद्वारे पूर्ण झाले. त्याचबरोबर सहकार क्षेत्रात अनेक लोकाभिमुख बदल श्री. शाह यांनी घडविले आहेत.

पालकमंत्री श्री. अबिटकर म्हणाले, तीर्थक्षेत्र विकास आराखडा हा कोल्हापूरवासियांसाठी अत्यंत अभिमानाचा व आनंदाचा क्षण आहे. तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातर्गत या ठिकाणी भाविकांना सुविधा निर्माण होतील. राज्यातील इतर सुविधांना ही केंद्र शासनाने गती देवून महाराष्ट्राचा विकास करावा अशी अपेक्षा याप्रसंगी व्यक्त केली.

तत्पूर्वी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचा संयोजकाच्या वतीने महालक्ष्मीची मूर्ती व तलवार देऊन सन्मान करण्यात आला. श्री. शाह यांच्या भाषणानंतर पालकमंत्री आबिटकर व महापौर रूपाराणी निकम यांच्या हस्ते मंदिर विकास आराखडा गृहमंत्र्यांना देण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक खासदार धनंजय महाडिक तर आभार प्रदर्शन वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी केले. या कार्यक्रमासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली यावेळी पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

# यंदा जांभळाचा सर्वत्र सडा: ज्या वर्षी जांभळांचा असा सडा पडतो, त्यावर्षी दुष्काळ पडतो

**उमरगा/प्रतिनिधी:** यंदाच्या उन्हाळ्यात अनेक भागांत जांभळांचा सडा पडताना दिसत आहे. ज्या झाडांना मागील वर्षी तुरळक फळे आली होती, तीही यंदा जांभळांनी लगडलेली दिसत आहेत. ज्या वर्षी जांभळांचा असा सडा पडतो, त्या वर्षी दुष्काळ पडतो, असा दावा करणारा संदेश समाज माध्यमात व्हायरल होत आहे. तसे पाहता हे सत्य नाही, असे वनस्पतीशास्त्रातील तज्ज्ञ सांगतात. हवामानातील बदल, गतवर्षी झालेला चांगला पाऊस, त्यानंतरचे वाढलेले तापमान याचा एकत्रित परिणाम म्हणून यंदा जांभळाच्या झाडाला फळे अधिक लागली, असे तज्ज्ञ सांगतात. मात्र जांभळाला जास्त फळे लागणे म्हणजे दुष्काळ पडणे, असे समजणे योग्य नाही, असेही त्यांनी सांगितले. मास्टिंग ही वनस्पतीशास्त्रातील मान्यताप्राप्त संकल्पना आहे. यात एखाद्या प्रजातीची झाडे काही वर्षांनी एकत्रितपणे मोठ्या प्रमाणात फळे आणि बिया तयार करतात. मात्र, याचा उद्देश दुष्काळाची भविष्यवाणी करणे नसतो. उलट, इतक्या मोठ्या प्रमाणात फळे तयार होतात की, ती खाणारे पक्षी, प्राणी किंवा कीटक सर्व फळे संपवू शकत नाहीत. परिणामी अधिकाधिक बिया सुरक्षित राहतात आणि नवीन रोपे तयार होण्याची शक्यता वाढते. झाडांना पाण्याचा ताण जाणवल्यास अधिक फळे तयार करण्याचा प्रयत्न करतात, हे विज्ञान मान्य करते. मात्र, याचा अर्थ झाडे भविष्यातील दुष्काळाची भविष्यवाणी करतात असा होत नाही. झाडे फक्त सध्याच्या परिस्थितीला प्रतिसाद देतात. जर सध्या उष्णता जास्त असेल किंवा भूजल पातळी कमी झाली असेल, तर त्याचा परिणाम फळधारणेवर दिसू शकतो. मात्र, यावरून पुढील काही महिन्यांत दुष्काळ पडणारच, असा निष्कर्ष काढणे चुकीचे आहे.



जांभळावरून दुष्काळाचा अंदाज मानता येत नाही ग्रामीण भागात पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेले अनेक निरीक्षणांमध्ये निसर्गाचे सूक्ष्म आकलन दडलेले असते. जांभळांचा सडा आणि दुष्काळायासारखी निरीक्षणेही दीर्घकालीन अनुभवातून निर्माण झाली असावीत. मात्र अशा निरीक्षणांचा अर्थ लावताना वैज्ञानिक कारणांचा विचार करणे ही तितकेच महत्त्वाचे आहे.

**पाऊस, हवामान यांच्या एकत्रित बदलाचा परिणाम एखाद्या वर्षी भरपूर फळधारणा होण्यामागे अनेक कारणे असू शकतात. मागील वर्षातील चांगला पाऊस, झाडांची आरोग्यदायी वाढ, हवामानातील बदल, तापमानातील वाढ आणि नैसर्गिक मास्टिंग प्रक्रियाचा एकत्रित परिणाम म्हणून यंदा जांभळांचे उत्पादन वाढलेले आहे. वाढलेल्या तापमानामुळे फळे एकाच वेळी मोठ्या प्रमाणात पिकतात आणि झाडाखाली सडा पडल्यासारखे दृश्य निर्माण होते.**

**– प्रा. डॉ. विनोद देवरकर, अभ्यासक**

# ११ वर्षांपासून फरार असलेल्या दोघांना अखेर बेड्या. पोलीस ठाणे भादाची कारवाई

**लातूर/प्रतिनिधी:** वर्षानुवर्षे फरार राहून कायद्याला चकवा देणाऱ्या आरोपींना न्यायालयासमोर उभे करण्याच्या उद्देशाने जिल्हा पोलीस दलाकडून विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये प्रलंबित असलेल्या गंभीर गुन्ह्यांचा तसेच फरार आरोपींच्या अभिलेखांचा सखोल आढावा घेत संबंधित अधिकारी व अंमलदारांना अशा आरोपींचा शोध घेऊन त्यांना तातडीने अटक करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या होत्या. त्या अनुषंगाने अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या विशेष शोध मोहिमेत आणखी एक उल्लेखनीय यश पोलीसांना मिळाले आहे.



पोलीस ठाणे भादा येथे सन २०१५ मध्ये दाखल असलेल्या चोरीच्या गुन्ह्यातील तब्बल ११ वर्षांपासून फरार असलेल्या दोघांना अटक करण्यात पोलीसांना यश आले आहे.

दि. ५ ऑगस्ट २०१५ ते ६ ऑगस्ट २०१५ च्या मध्यरात्री दरम्यान प्राथमिक आरोग्य केंद्र, बेलकुंड येथील परिसरातील चंदनाच्या झाडाचा गाभा अज्ञात व्यक्तींनी चोरी करून नेला होता. चोरीस गेलेल्या चंदनाची किंमत सुमारे ५ हजार रुपये होती. याप्रकरणी प्राथमिक आरोग्य केंद्र, बेलकुंड येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. किरण पळणे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दि. ६ ऑगस्ट २०१५ रोजी पोलीस ठाणे भादा येथे गुरनं. ६६/२०१५, कलम ३७९ भादंवि तसेच भारतीय वन अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्याच्या तपासादरम्यान यापूर्वी तिघांना अटक करण्यात आली होती. मात्र नितीन (वय ४८ वर्षे, रा. सर्जापूर, ता. बार्शी, जि. सोलापूर) व रामचंद्र उर्फ राम धर्मराज (वय ५० वर्षे, रा. नारी, ता. बार्शी, जि. सोलापूर) या दोघांवर गुन्हा दाखल झाल्यापासून फरार होते.

विशेष मोहिमेदरम्यान पोलीसांनी तांत्रिक माहिती, गोपनीय बातमीदारांचे जाळे तसेच विविध ठिकाणी पडताळणी करून या दोन्ही आरोपींचा माग काढला. अखेर त्यांना शोधून ताब्यात घेण्यात आले. आरोपींविरुद्ध आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून पुरवणी दोषारोपपत्रासह त्यांना मा. न्यायालयासमोर हजर करण्यात आले आहे.

सदरची कारवाई पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक डॉ.विशाल शहाणे, पोहेकॉ फिरोज शेख, कांबळे, पोना/पाटील, पोअं/मोरे यांनी केली आहे.

## महात्मा बसवेश्वरमध्ये प्रा.बी.टी. देशमुख (भाऊ) यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण

**लातूर/ प्रतिनिधी:** महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात शिक्षण, समाजसेवा व मूल्यनिष्ठ कार्याचे दीपस्तंभ असणारे महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष तथा माजी आमदार प्रा. बी. टी. (भाऊ) देशमुख यांना स्थानिक स्वामुक्टाच्यावतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. (डॉ.) सिद्राम डोंगरगे हे होते.

यावेळी प्राचार्य प्रो. (डॉ.) सिद्राम डोंगरगे म्हणाले की, शिक्षण, समाजसेवा आणि मूल्यनिष्ठ कार्याचा अखंड दीप प्रज्वलित ठेवणारे आदरणीय प्रा. बी. टी. देशमुख (भाऊ) यांच्या निधनाने शैक्षणिक व सामाजिक क्षेत्राची मोठी हानी झाली आहे. त्यांचे व्यक्तिमत्त्व, दूरदृष्टी, कार्यनिष्ठा आणि विद्यार्थ्यांप्रती असलेली तळमळ सदैव स्मरणात राहील. त्यांनी आयुष्यभर केलेले ज्ञान दान, समाज प्रबोधन आणि मानवतावादी मूल्यांची जपणूक भावी पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल. महाराष्ट्रात त्यांचे स्थान केवळ संघटनात्मक नेते म्हणून नव्हे, तर शिक्षकांच्या हक्कांसाठी आयुष्यभर संघर्ष करणारे मार्गदर्शक आणि प्रेरणास्थान म्हणून मानले जाते.

यावेळी प्रो.(डॉ.) दीपक चाटे म्हणाले की, प्रा. बी. टी. देशमुख (भाऊ) यांचे नाव आणि कार्य हे नागपूर टीचर युनिवर्सिटी असोसिएशन (नुटा) या संघटनेशी अतूटपणे जोडलेले आहे. त्यांना अनेकदा नुटाचे शिल्पकार म्हणून सुद्धा संबोधले जाते. नुटा ही विदर्भातील विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकांची प्रभावी संघटना आहे. डॉ. बी. टी. देशमुख यांनी या संघटनेचे नेतृत्व सुमारे साडेतीन दशके केले आणि शिक्षकांच्या प्रश्नांना संघटित स्वरूप दिले. महाविद्यालयीन व विद्यापीठीय प्राध्यापकांच्या वेतनश्रेणी, सेवाशर्ती, पदोन्नती आणि निवृत्तीविषयक प्रश्नांसाठी सातत्याने लढा दिला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. डी. आर. भूरे यांनी केले.

या कार्यक्रमास स्थानिक शाखा, स्वामुक्टा, महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूरचे सर्व पदाधिकारी, सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# डिप्लोमा उन्हाळी परीक्षा २०२६ मध्ये एम.एस.बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

**लातूर/प्रतिनिधी:** येथील एम.एस.बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या डिप्लोमा विभागातील एम.एस.बी.टी.ई. तर्फे घेतल्या गेलेल्या परीक्षांचे निकाल नुकतेच जाहीर झाले. या परिक्षेत तब्बल २२ विद्यार्थीनी गणित विषयांमध्ये १०० पैकी १०० गुण मिळवले आहेत. यामध्ये कॉम्प्युटर विभागाचे १३, आयटी विभागाचे ६, इलेक्ट्रिकल विभागाचे २ आणि इलेक्ट्रॉनिक्स विभागाचा १ असे २२ विद्यार्थी आहेत. या विद्यार्थ्यांना प्रा. तानाजी सोनवणे आणि प्रा. पंकज कोरे यांनी मार्गदर्शन केले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शेखर जगदे, उप प्राचार्य वीरभद्र बाळे ,निबंधक डॉ. सौ ज्योती पाटील, डिप्लोमा प्रभारी डॉ. सुरज डामरे यांनी सर्व विद्यार्थ्यांचे आणि संबंधित प्राध्यापकांचे अभिनंदन केले आहे.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे, उपाध्यक्ष श्री माधवराव पाटील चिंचोलीकर, सचिव श्री माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव श्री सुनील मिटकरी, कोषाध्यक्ष श्री विजय रेवडकर,कार्यकारी संचालक श्री प्रदीप दिंडेगावे,. संचालक श्री राजेश्वर बुके, श्री बसवराज येरटे, श्री काशिनाथ साखरे, सौ ललिताताई पांढरे, श्री महेश हलगे, श्री बाबुराव तरगुडे,श्री गुरुलिंग धाराशिवे यांनी सर्व विद्यार्थ्यांचे व संबंधित प्राध्यापकांचे मन:पूर्वक अभिनंदन केले आहे.


प्रो. जडे यांचे रबरी शिक्के

कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले टिकाऊ रबरी शिक्के तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर

शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर

संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# महापारेषणमध्ये १२ वा आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

## विश्वाशी जोडणारी जीवनपध्दती म्हणजे योग- अपर जिल्हाधिकारी तथा कार्यकारी संचालक श्रीमती सुचिता भिकाने यांचे प्रतिपादन

**मुंबई/प्रतिनिधी:** योग हा केवळ शरीर तंदुरुस्त ठेवण्याचा व्यायाम नसून मन, शरीर आणि आत्म्याला ब्रह्मांडाच्या नैसर्गिक लयीशी जोडणारी जीवनपध्दती आहे. योग म्हणजे आपल्या अस्तित्वाला विश्वाशी जोडणारे प्रभावी माध्यम असून तो निरोगी, संतुलित आणि आनंदी जीवनाचा आधार आहेऋत्रऋ, असे प्रतिपादन अपर जिल्हाधिकारी तथा महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या (महापारेषण) कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्रीमती सुचिता भिकाने यांनी केले.

वांद्रे येथील महापारेषणच्या प्रकाशगंगा इमारतीच्या प्रांगणात आयोजिलेल्या १२ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या कार्यक्रमात श्रीमती भिकाने बोलत होत्या. या वेळी पद्मश्री उदय देशपांडे, आंतरराष्ट्रीय निसर्गोपचार संघटनेचे कार्यकारी अध्यक्ष श्री. शिवानंद महाराज, द ह्युमन योगा फाऊंडेशनचे संस्थापक, आंतरराष्ट्रीय योगगुरू श्री. राधेश्याम जैस्वर, आंतरराष्ट्रीय प्रेरणादायी प्रशिक्षक डॉ. रत्नाकर अहिरे, समाजसेवक डॉ. संतोष पांडे, योगप्रेमी चेतना आचार्य, महापारेषणचे मुख्य अभियंता श्री. पीयूष शर्मा, श्री. प्रमोद चिमणकर, श्रीमती शिल्पा कुंभार, महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. राजू गायकवाड, मुख्य विधी सल्लागार श्री. विजय पाटील, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, राजशिष्टाचार अधिकारी श्री. सतिश जाधव उपस्थित होते.




यंदाच्या आंतरराष्ट्रीय योग दिनाची निरोगी वार्धक्यासाठी योग ही जागतिक संकल्पना केंद्रस्थानी ठेवून विशेष योगासनाचे आयोजन करण्यात आले. वाढत्या वयातही शारीरिक सुदृढता, मानसिक स्थैर्य आणि सकारात्मक जीवनशैली जपण्यासाठी योग हा अत्यंत प्रभावी मार्ग असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

आंतरराष्ट्रीय योगगुरू श्री. राधेश्याम जैस्वर यांनी योगाचे वैज्ञानिक महत्त्व, आरोग्यदायी फायदे आणि दैनंदिन जीवनातील उपयुक्तता याविषयी मार्गदर्शन केले. दैनंदिन व्यस्त जीवनातून काही मिनिटे योगासाठी दिल्यास शरीर आणि मन दोन्ही सुदृढ व प्रसन्न राहते, असे त्यांनी सांगितले. श्री समर्थ व्यायाम मंदिरचे प्रमुख पद्मश्री उदय देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली मुलांनी आणि मुलींनी नेत्रदीपक मल्लखांबाची प्रात्यक्षिके सादर केली.

सुमारे तासभर चाललेल्या या योगसत्राची सुरुवात वंदे मातरम आणि राष्ट्रगीताने झाली. त्यानंतर ताडासन, वृक्षासन, पादहस्तासन, अर्धचक्रासन, त्रिकोणासन यांसह विविध उभी आसने केली. समारोप सत्रात कपालभाती, नाडीशोधन, अनुलोम-विलोम आणि भ्रामरी प्राणायामासह ध्यान प्रक्रियेचा सराव करण्यात आला.

यावेळी मान्यवरांचा स्मृतीचिन्ह, भेटवस्तू व प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती मानसी सोनटक्के यांनी केले. महापारेषणचे महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. राजू गायकवाड यांनी आभार मानले. शेवटी महाराष्ट्र गीताने कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी सात्त्विक आणि सकस अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली होती.



---

**पर्जन्य योगा**

१२ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने आयोजिलेल्या योग कार्यक्रमात सुरूवातीला जोरदार पाऊस सुरू असतानाही महापारेषणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी भर पावसातही योगा केला. अपर जिल्हाधिकारी तथा महापारेषणच्या कार्यकारी संचालक श्रीमती सुचिता भिकाने या स्वतः पावसात योगा करत असल्याने पाहून अधिकारी व कर्मचाऱ्यांनाही हुरूप आला. तसेच महापारेषणच्या सातही परिमंडळामध्येही योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

# लातुरात विविध उपक्रमांनी साजरी होणार महेश नवमी

**लातूर/प्रतिनिधी:** लातूर जिल्हा माहेश्वरी सभेच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही दि. २३ व २४ जून २०२६ रोजी विविध उपक्रमांनी महेश नवमी साजरी करण्यात येणार आहे.

महेश नवमीचे औचित्य साधून लातूर शहरातील छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील गौरीशंकर मंदिरापासून भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. शोभायात्रेदरम्यान माहेश्वरी ढोल ताशा पथक विशेष आकर्षण राहणार आहे. शोभा यात्रेचे संयोजक ईश्वर बाहेती, संतोष तोष्णीवाल, गणेश हेड्डा, नंदकिशोर लोया, राहुल लोया, ईश्वर चांडक, दिनेश गिल्डा हे आहेत. यावर्षीच्या महेश नवमी उत्सवाच्या स्नेहभोजनाचे यजमान तोष्णीवाल हे असून स्नेहभोजनाचा कार्यक्रम मंगळवार दि. २३ जून रोजी सायंकाळी ७ ते १० या वेळेत गोदावरीदेवी लाहोटी कन्या प्रशाला येथे होईल. याच ठिकाणी रक्तदान शिबिराचेही आयोजन करण्यात आले आहे.

दि. २४ जून रोजी दुपारी चार वाजता दयानंद सभागृहात माहेश्वरी समाजासाठी आपला अमूल्य वेळ, श्रम एवं यथाशक्ती आर्थिक सहयोग देणाऱ्या मान्यवरांना महेश भूषण, महेश गौरव, महेश सेवा पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. या सोहळ्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य केमिस्ट अँड ड्रगिस्ट असो.चे सचिव अनिलकुमार नावंदर यांचे मार्गदर्शन होणार आहे. नावंदर हे विसरत चाललेले संस्कार आणि पारिवारिक संबंध दृढ करण्याकामी प्रेरणादायी - प्रखर वक्ते म्हणून परिचित आहेत. लातूर जिल्हा महिला माहेश्वरी संगठनच्या वतीने शिवस्य नवारसामृतम ही भव्य दिव्य नृत्य नाटिका सादर केली जाणार आहे. यावेळी माहेश्वरी समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान केला जाणार आहे. या कार्यक्रमाचे संयोजक आनंद चरखा, सुरभी कचोलिया, अनिकेत चांडक हे आहेत. या सोहळ्याप्रसंगी लातूर जिल्हा माहेश्वरी सभेचे अध्यक्ष सीए प्रकाश कासट , सचिव राजेशकुमार मंत्री, अ . भा. महासभा सदस्य हुकूमचंद कलंत्री, फुलचंद काबरा, बालकिशन मुंदडा, माहेश्वरी सभेचे कोषाध्यक्ष जगदीश भुतडा, महाराष्ट्र प्रदेश माहेश्वरी महिला संगठनच्या प्रदेश सचिव सौ.अनिता मालू, लातूर जिल्हा महिला संगठनच्या अध्यक्षा सौ. ललिता राठी, महाराष्ट्र प्रदेश युवा माहेश्वरी संगठन चे संगठन मंत्री तथा सहकार मंत्री राम भुतडा, लातूर जिल्हा युवा माहेश्वरी सांगाथांचे अध्यक्ष अभिषेक मुंदडा, लातूर शहर माहेश्वरी सभेचे अध्यक्ष लक्ष्मीकांत सोनी, युवा माहेश्वरीचे अध्यक्ष निकुंज भुतडा,माहेश्वरी किशोरी मंडलच्या प्रांजल डागा, संयोजक संतोष तोष्णीवाल, गणेश हेड्डा, ईश्वर बाहेती, राहुल लोया, एड. नंदकिशोर लोया, संतोष तोष्णीवाल यांची मंचावर उपस्थिती राहणार आहे.

लातूर जिल्हा माहेश्वरी सभेच्यावतीने श्री महेश नवमी निमित्त आयोजित करण्यात आलेल्या या सर्व उपक्रमात समाज बांधवांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा,असे आवाहन लातूर जिल्हा माहेश्वरी महासभेचे अध्यक्ष सीए प्रकाश कासट , सचिव राजेशकुमार मंत्री, कोषाध्यक्ष जगदीश भुतडा, संगठन मंत्री फुलचंद काबरा, उपाध्यक्ष शामसुंदर मानधना , विष्णुदास मंत्री, चांदकरण लड्डा, रामेश्वर पुनपाळे, अशोक बाहेती, ओमप्रकाश सारडा, रामेश्वर भराडिया, गोकुळदास चांडक, दिलीप सोमाणी, नंदकिशोर करवा , राजगोपाल बांगड, संजय जाजू, नंदकिशोर लोया, राजकुमार सोनी, प्रल्हाद चांडक,अशोक जाजू,संतोष तोष्णीवाल, ईश्वर चांडक, राहुल लोया, राम भुतडा, जयराम भुतडा, सत्यनारायण हेड्डा, राजगोपाल बाहेती, संतोष मुंदडा,गोपाल काबरा यासह समाजातील मान्यवरांनी केले आहे.

# बाभळगाव महाविद्यालयात १२ वा आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

**बाभळगाव/प्रतिनिधी:** जागतिक स्तरावर साजऱ्या करण्यात येणाऱ्या १२ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथे विविध योगासने, प्राणायाम व ध्यानसाधनेचे आयोजन करून योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्रारंभी योगशिक्षक प्रा. संतोष कल्याणकर यांनी योग अभ्यासाबद्दल मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांसह प्राध्यापकांनी यावेळी प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विविध योगासने, प्राणायाम आणि ध्यानाचा सराव करण्यात आला. नियमित योगाभ्यासामुळे शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक स्वास्थ्य, आत्मविश्वास आणि सकारात्मक जीवनशैली विकसित होते. योग हा भारतीय संस्कृतीचा अमूल्य वारसा असून निरोगी आणि संतुलित जीवनासाठी योगाचे महत्त्व अनन्यसाधारण असल्याचे यावेळी प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनीही योगाभ्यासाचे महत्त्व जाणून घेत नियमित योग करण्याचा संकल्प व्यक्त केला.

योगदिनाच्या निमित्ताने राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख डॉ. सुरेशकुमार कांबळे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि आभार मानले. या उपक्रमात डॉ. दशरथ भिसे, डॉ. शाहूराज मुळे, डॉ. मा.ना. गायकवाड, डॉ. कांतराव पोले, डॉ. अजित भांजी, डॉ. पांडुरंग मुंढे, प्रा. संदीपपान चवले, प्रा. ज्ञानदेव कांबळे, डॉ. जयदेवी पवार, प्रा. बालिका गौंड, बाळासाहेब देशमुख, वसंत मस्के, अंकुश थरकर, नितीन पाटील यांनी सहभाग नोंदविला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालय प्रशासन, प्राध्यापक, क्रीडा विभाग व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाची सांगता सर्वांनी निरोगी, आनंदी व सुदृढ जीवनासाठी नियमित योग करण्याच्या संदेशाने झाली.

# श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात "जागतिक योग दिन" उत्साहात साजरा



**लातूर/प्रतिनिधी:** येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात दि.२१ जून २०२६ रविवार रोजी जागतिक योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष गंगाधर खेडकर, प्रमुख पाहुणे तथा योगप्रशिक्षक ड. जगन्नाथ चित्ताडे, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य संजय गुरव, माध्यमिक शालेय समितीचे सदस्य नरेंद्र पाठक, विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाची सुरुवात भारत माता व योगशास्त्राचे जनक महर्षी पतंजली यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली.

याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे तथा योगप्रशिक्षक ड. जगन्नाथ चित्ताडे यांनी आपल्या मनोगतात दैनंदिन जीवनातील योगाचे महत्त्व व्यक्त केले. याप्रसंगी त्यांनी योगासनांचे विविध प्रकार, प्राणायाम व ध्यानधारणा यांची प्रात्यक्षिके करून घेतली.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक, परिचय व स्वागत अमोल नराळे यांनी केले. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन मेघा सूर्यवंशी यांनी केले तर शैला कुलकर्णी यांच्या कल्याण मंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली.

बलोपासक मंडळांतर्गत घेण्यात आलेल्या या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी केंद्रीय विद्यासभा संयोजक तथा उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, पर्यवेक्षक राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर, अंजली निर्मळे, राम जोशी, धनंजय कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यासपूरक मंडळ प्रमुख सुनिता बनसोडे, बलोपासक मंडळ प्रमुख प्रयागराज गरुड, गुरुनाथ झुंजारे, कार्यक्रम प्रमुख अशोक रायते तसेच व्यवस्थेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.


निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र

सितारी विमा सेवा केंद्र

दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.

वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत

जमीरोद्दीन सितारी

चेअरमन क्लक मेंबर CLIA

संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396


## योग विद्या..

योग विद्येचे महत्त्व
एक दिस स्मरतात
आबाल वृध्द सारे
कार्यक्रमां रमतात
फोटो सेल्फी घेण्यां
कठीण पोज देतात
औषध गोळ्यां पुढे
कितीदिवस घेतात
नियमित करू योग
शुभ मुहूर्त करतात
आरंभशूरता रक्तात
बोलहे फोलठरतात
परंपरेने मिळालेला
अमृतकलश हातात
निरोगी तत्व लाभले
मिसळू द्यावे रक्तात
स्वस्थ तनमन दोन्ही
योग क्षेमं या तत्वात
सांभाळावे आरोग्य
कसूर नसे महत्वात
संकल्प नको मनात
योग हवा प्रत्यक्षात
वारसा जपा कर्तव्य
ठेवावे नित्य लक्षात
बीज तयार भारतात
रूजले संपूर्णविश्वात
अश्वमेध यज्ञ करावा
शक्ती वेगळी अश्वात

**हेमंत मुसरीफ पुणे**
९७३०३०६९९६

# जनकल्याण निवासी विद्यालयात आंतरराष्ट्रीय योगदिन उत्साहात संपन्न

**लातूर/प्रतिनिधी:** हरंगुळ (बु.), ता. लातूर येथील जनकल्याण निवासी विद्यालयात २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योगदिन उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

यावेळी क्रीडा भारतीचे महादेव झुंजे, योग शिक्षक रामलिंग बिडवे, भारत विकास परिषदेचे जयदीप कोरे, श्री. मुकुंदजी पाठक, मुख्याध्यापक ज्ञानेश्वर सोनटक्के, वसतिगृह अधीक्षक श्री. दत्ता माने, सहअधीक्षक श्री. बाबासाहेब मते आदी मान्यवर उपस्थित होते.



आंतरराष्ट्रीय योगदिनाच्या निर्धारित प्रोटोकॉलनुसार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात लातूर येथील भारत विकास परिषदेचे कार्यकर्ते, सर्व शिक्षक, पर्यवेक्षक, व्यवस्था विभागातील कर्मचारी-कार्यकर्ते, कुटुंबातील सदस्य तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनी यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

योगामुळे शारीरिक, मानसिक व बौद्धिक आरोग्य संवर्धनास चालना मिळते, असा संदेश यावेळी उपस्थित मान्यवरांनी दिला. कार्यक्रमाचे नियोजन श्री. सचिन पाटील व श्री. किशोर गिरवलकर यांनी केले.

कार्यक्रमास शिक्षक, कर्मचारी, कार्यकर्ते व विद्यार्थ्यांची उल्लेखनीय उपस्थिती लाभली. सामूहिक योगाभ्यासातून निरोगी जीवनशैलीचा संदेश देत आंतरराष्ट्रीय योगदिनाचा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

# राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूलमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

**लातूर/प्रतिनिधी:** येथील राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूलमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात आणि विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. सलग १२ व्या वर्षी शहरातील मुख्य चौकात आकर्षक रांगोळी काढून YOGA FOR HE-LTHY AGIENG या संदेशाकडे मार्गस्थांचे लक्ष आकर्षिले. योग सप्ताहानिमित्त आयोजित कार्यक्रमात विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि नागरिक आदी एकूण २००० व्यक्तींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत निरोगी जीवनाचा संदेश दिला.

कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्य कर्नल श्रीनिवासूलू, प्रशिक्षक साबदे आणि माडेकर यांच्या हस्ते महर्षी पतंजली, श्री सरस्वती, सेठ पुरणमल लाहोटी आणि राजा नारायणलाल लाहोटी यांच्या प्रतिमांचे पूजन करून झाली. योगगुरू दीपकजी गटागट यांच्या मार्गदर्शनाखाली योग सप्ताह दरम्यान विद्यार्थ्यांना योगाचे प्रशिक्षण देण्यात आले. आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त क्रीडा शिक्षक सुनील मुनाळे व शैलेंद्र डावळे यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेच्या प्रांगणात सर्व विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि नागरिकांनी सामूहिक योगासने, प्राणायाम व सूर्यनमस्कार करून आरोग्याचा संकल्प केला.योग सप्ताहादरम्यान आयोजित सूर्यनमस्कार, योग, चित्रकला आणि सुलेखन, फलक निर्मिती स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा पदक व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. यावेळी विश्व संगीत दिवसाचे औचित्य साधत संगीत शिक्षक शिरीष देशपांडे यांनी प्रेरणादायी गीत सादर करून कार्यक्रमात उत्साह निर्माण केला.



योगगुरू दीपकजी गटागट यांनी योगाचे शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक महत्त्व स्पष्ट करत, नियमित योगाभ्यास केल्यास निरोगी व संतुलित जीवन जगता येते, असा संदेश दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कौस्तुभ जोशी यांनी केले, तर आभार प्रदर्शन देवयानी देशपांडे यांनी केले. याचबरोबर शाळेच्या कला विभागाच्या वतीने हनुमंत थडकर, अमोल देशमुख आणि प्रशांत शिंदे, ज्ञानेश्वर गोसावी, तुषार येवनगे यांनी शहरातील प्रमुख चौकांमध्ये आकर्षक योगदिन विशेष रांगोळ्या साकारून नागरिकांचे लक्ष वेधून घेतले व योगाबाबत जनजागृती केली.

यावेळी प्राचार्य कर्नल श्रीनिवासूलू, रजिस्ट्रार प्रवीण शिवणगीकर, उपप्राचार्य रिना नायर, माध्यमिक समन्वयक मनोहर कबाडे, प्राथमिक विभाग प्रमुख अरुल सेल्वी, पर्यवेक्षक बी. के. भालेराव यांच्यासह सर्व शिक्षक, पालक, विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


**मध्य रेल्वे**
सोलापुर मंडळ
अभियांत्रिकी कार्य

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कामे) मध्य रेल्वे सोलापूर आणि मा.भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने खालील कामांसाठी नामांकित संस्था/कंत्राटदारांकडून ई-निविदा मागवत आहेत: **निविदा सूचना क्र.: 19-2026-SrDENS. कामाचे नाव:** १ रेल्वे रुग्णालय, सोलापूर येथे भूमिगत टाकी, पाणीपुरवठा वाहिनी, पंप हाऊस आणि सांडपाणी प्रवाह प्रणालीसह एसटीपी (STP - 50 KLD) ची तरतूद. २ ADEN/KLBG अंतर्गत SDB येथे भूमिगत टाकी, पाणीपुरवठा वाहिनी आणि पंप हाऊससह सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (STP - 50 KLD). **कामाचा अंदाजित खर्च:** २,५४,०२,४४६.८६/-, **अनामत रक्कम:** ५,०८,१००/-, **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** १२ महिने, **देखभाल कालावधी:** ३६ महिने. **निविदा सूचना क्र.: 20-2026-SrDENS. कामाचे नाव:** Sr. DEN(S) यांच्या अधिकारक्षेत्रातील ट्रॅकची अलाईनमेंट सुधारण्यासाठी Prism GEDO TROLLY सर्वेक्षण. **कामाचा अंदाजित खर्च:** १,६१,०३,४२५/-, **अनामत रक्कम:** ३,२२,१००/-, **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** २४ महिने, **देखभाल कालावधी:** लागू नाही. www.ireps.gov.in **या संकेतस्थळावर निविदा अपलोड करण्याची अंतिम तारीख आणि वेळ: १०.०७.२०२६ रोजी १५.०० वाजेपर्यंत.** www.ireps.gov.in वर **निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ: १०.०७.२०२६ रोजी १५.३० वाजता.** इच्छुक निविदाकारांना सल्ला दिला जातो की, निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी या निविदेबाबत जारी केलेले कोणतेही बदल किंवा शुद्धिपत्रके पाहण्यासाठी त्यांनी संकेतस्थळाला वारंवार भेट द्यावी. संकेतस्थळ: www.ireps.gov.in **मं.रे.प्र. (कार्य)**

धोकादायक आणि स्फोटक वस्तू घेऊन प्रवास करणे हा दंडनीय गुन्हा आहे 33



Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26

हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६